- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, १७ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २१८ | किंमत : २ रूपये


**सोने-चांदी**

- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-


**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...

- दैनिक सिंहवाणी वृत्त -

९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६



**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६

९६५७२३२०२६


# शरद पवारांचा पक्ष एनडीएमध्ये सामील होणार का ?



## जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड एकनाथ शिंदेंच्या निवासस्थानी

**वृत्तसंस्था, मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या नंदनवन निवासस्थानी भेट घेतली. यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड देखील उपस्थित होते. या भेटीमुळं राजकीय वर्तुळाच चर्चांना उधाण आलं आहे. जवळपास तासभर दोन्ही नेते नंदनवनवर होते. फक्त जयंत पाटील आणि एकनाथ शिंदे यांच्यात अर्धा तास बंद दाराआड झाली चर्चा झाल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएमध्ये सामील होणार अशा चर्चा सुरु असतानाच जयंत पाटील यानी एकनाथ शिंदेंची भेट घेतल्यानं या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, जयंत पाटील आणि एकनाथ शिंद यांच्यात बंददाराआड नेमकी काय चर्चा झाली, याबाबत देखील तर्क वितर्क लढवले जात आहेत. जवळपास तासभर दोन्ही नेते नंदनवनवर होते. फक्त जयंत पाटील आणि एकनाथ शिंदे यांच्यात अर्धा तास बंद दाराआड झाली चर्चा झाली आहे. दोनच दिवसांपूर्वीच जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा या निवासस्थानी भेट घेतली होती. त्यावेळी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे हेदेखील होते वर्षावर निवासस्थानी उपस्थित होते. अशातच आज जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे.

दरम्यान, अधिवेशनाच्या काळात शरद पवार यांनी देखील एकनाथ शिंदेंची भेट घेतली होती. शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीए मध्ये सामील होणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. अशातच जयंत पाटील यांनी आधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तर आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. शरद पवार राष्ट्रवादी एनडीए मध्ये सामील झाल्यास अर्थखात जयंत पाटील यांना अर्थ मंत्री पद मिळणार असल्याची चर्चा सुरु आहे. तिन्ही नेत्यांमध्ये याबाबत चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

मागील दोन दिवसांच्या आतच जयंत पाटील यांनी आधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नंतर एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याने राज्याच्या राजकारणात काही मोठं घडणार आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**थोडक्यात**

## रायपूरमध्ये ई-२० पेट्रोल टाकल्याने इंजिन खराब

**रायपूर :** देशभरात पेट्रोलमध्ये ई-२० च्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. याच दरम्यान रायपूरमध्ये ई २० पेट्रोलमुळे कारचे इंजिन खराब झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. या संबंधित प्रकरणात ग्राहक न्यायालयाने मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड आणि तिच्या अधिकृत डीलरला जबाबदार धरले आहे. न्यायालयाने सांगितले की नवीन कार द्यावी किंवा २० लाख रुपये परत करावेत. न्यायालयाने मान्य केले की, गाडीचे इंजिन ई-२० इंधनानुसार नव्हते, तरीही ती कार ग्राहकाला विकण्यात आली. न्यायालयाने सांगितले की ४५ दिवसांच्या आत ग्राहकाला त्याच मॉडेलची नवीन कार द्यावी, जी ई-२० इंधनासाठी अनुकूल असेल. जर असे केले नाही तर कंपनीला वाहनाची संपूर्ण किंमत सुमारे २०.५ लाख रुपये आणि इतर खर्च देखील परत करावे लागतील.

कंपनीने मान्य केले की पहिल्यांदा टाकी पूर्णपणे स्वच्छ झाली नव्हती आणि रासायनिक इंधन आत राहिले होते. त्यानंतर पुन्हा स्वच्छता करण्यात आली, परंतु पुन्हा इंधन टाकी, पाइपलाइन आणि फिल्टरमध्ये पांढरा थर आणि द्रव पदार्थ आढळला. पुढच्या वेळी डॅशबोर्डवर इंजिनमध्ये बिघाडाची चेतावणी आली आणि ईव्ही (इलेक्ट्रिक वाहन) मोडने काम करणे बंद केले. इंजिन पूर्णपणे बंद पडले आणि कार चालवण्यायोग्य राहिली नाही.

## इस्त्रोच्या १०० वैज्ञानिकांनीही नोकरी सोडली

**वृत्तसंस्था, बंगळुरू**

इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्त्रो) च्या गगनयान आणि इतर महत्त्वाच्या मोहिमांशी संबंधित वैज्ञानिक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या राजीनाम्यांना आणि स्वेच्छानिवृत्तीला (व्हीआरएस) आता पूर्वीसारखी सहज मंजुरी मिळणार नाही. अंतराळ विभागाने (डीओएस) १४ जुलै रोजी नवीन निर्देश जारी केले आहेत. यात म्हटले आहे की, गट अ मधील वैज्ञानिक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांचे राजीनामे किंवा व्हीआरएसचे अर्ज नियमित प्रक्रियेनुसार स्वीकारले जाऊ नये. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हे निर्देश अशा वेळी आले आहेत, जेव्हा मागील १० महिन्यांत १०० हून अधिक कर्मचऱ्यांनी इस्त्रो सोडले आहे. सर्वाधिक राजीनामे बंगळुरू येथील यू.आर. राव सॅटेलाइट सेंटर (यूआरएससी) आणि तिरुवनंतपुरम येथील विक्रम साराभाई स्पेस सेंटरमधून (व्हीएसएससी) झाले आहेत. राजीनामा देणाऱ्यांमध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ व्हिक्टर जोसेफ टी यांचाही समावेश आहे. ते व्हीएसएससीमध्ये जिओसिंक्रोनस सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल एम ककक प्रकल्पाचे प्रकल्प संचालक होते असे सांगण्यात आले आहे की त्यांनी फेब्रुवारीमध्ये राजीनामा दिला. यापूर्वी ते सुमारे १३ महिने एलव्हीएम३ प्रकल्पाची जबाबदारी सांभाळत होते. हेच लॉन्च व्हेईकल गगनयान मिशनमध्ये वापरले जाईल.

आदेशात म्हटले आहे की, राजीनामे आणि व्हीआरएसच्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्यामुळे गगनयान आणि इतर राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रकल्पांवर परिणाम होत आहे. त्यामुळे नोकरी सोडण्याच्या अर्जांवर आता अंतिम निर्णय अंतराळ विभाग घेईल. हे निर्देश यूआरएससी, व्हीएसएससी, सतीश धवन स्पेस सेंटर, लिक्विड प्रोपल्शन सिस्टम्स सेंटर, स्पेस ॲप्लिकेशन्स सेंटर, नॅशनल रिमोट सेन्सिंग सेंटर, इस्ट्रॅक आणि मास्टर कंट्रोल फॅसिलिटी यासह अनेक केंद्रांना पाठवण्यात आले आहेत.

# ठाकरे बंधुंचा वांगचुक यांना पाठिंबा

**वृत्तसंस्था, मुंबई**

देशभरातील तरुणांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या सोनम वांगचुक आणि अभिजित दिपके यांना उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने, तसेच मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पाठिंबा दिला आहे. दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि निष्ठूर भाजप सरकारला जाब विचारण्यासाठी येत्या १९ जुलैला शिवाजी पार्क मैदानावर एकत्र येण्याचे आवाहन उद्धव ठाकरे गटाने केले आहे.

नीट आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील घोटाळ्यांची व पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्वरित राजीनामा द्यावा, या मागणीसह तरुणांच्या विविध मागण्यांसाठी प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. गेल्या १८ दिवसांपासून त्यांचे उपोषण सुरू असून त्यांची प्रकृतीही



खालावली आहे.

केंद्र सरकारने मात्र अजूनही या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेतलेली नाही. त्यामुळे आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणून २० जुलैला दिल्लीमध्ये जंतर मंतरपासून संसद भवनावर निघणाऱ्या भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी १९ जुलैला शिवाजी पार्क येथे (शिवतीर्थ) मॉंसाहेब मीनाताई ठाकरे ह्यांच्या पुतळ्याजवळ एकत्र येण्याचे आवाहन आदित्य ठाकरे यांनी केले आहे.

संध्याकाळी ४ वाजता भेटूया. हा लढा सर्वांचा आहे, कुणा एका राजकीय पक्षाचा नाही. त्यामुळे सगळ्यांनी जमुया आणि देशाच्या तरुणांचा आवाज बनूया, असे आवाहन शिवसेना उबाठाचे नेते आदित्य ठाकरे यांनी गुरुवारी एक्स या समाज माध्यमातून केले.

### राज ठाकरेंचाही सोनम वांगचूक यांना पाठिंबा

नीट पेपरफुटीसंदर्भात कारवाई व्हावी या मागणीसाठी उपोषण सुरू केलेल्या सोनम वांगचूक यांना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पाठिंबा दर्शविला आहे. सोनम वांगचुक यांच्या मागण्यांबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेना पूर्णपणे सहमती दर्शवत आहे. फक्त नीट नाही तर एकूणच सर्व परीक्षांमध्ये पारदर्शकता यायला हवी आणि दोषी मंत्र्यांचा राजीनामा यायलाच हवा. आम्ही राजकीय पक्ष म्हणून पूर्ण शक्तीने या आंदोलनाच्या आणि लोकभावनेचा पाठीशी आहोत आणि कायम असू देखील असे राज ठाकरे यांनी सोशल मिडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विषयी जरा लक्ष घालावे अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

भाजपच्या सत्तेच्या काळात सर्वत्र परीक्षांमध्ये घोळ होत आलेत. मध्यप्रदेशातील व्यापम घोटाळ्यापासून ते नीटच्या परीक्षांचे पेपर्स फुटणे ते अगदी आत्ता शिक्षकांच्या परीक्षांचे पेपर्स फुटण्यापर्यंत. हे सगळं यांच्या काळात का होतं आणि ते झाल्यावर हे इतके निर्ढावल्यासारखे का वागतात याचं उत्तर सोपं आहे. ते म्हणजे हाताशी सगळ्या यंत्रणांना धरून आलेली अमर्याद सत्ता. हे सरकार राजकीय किंवा निवडणुकांचा स्वार्थ नसेल तर कदापि कुठल्याही आंदोलनाकडे बघणार पण नाही.

ते कायम आंदोलनकर्त्यांना देशद्रोही ठरवणार, यांत काहीतरी घातपात आहे असल्या शक्यता पेरत राहणार. कारण या असल्या कुजबुज मोहिमांवर आणि यंत्रणांच्या जोरावर तर यांच्या सत्तेचा डोलारा टिकला आहे, अशी टीका राज ठाकरे यांनी केली आहे.

### पंतप्रधानांनी लक्ष घालावे

माझी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती आहे की जरा या प्रश्नात लक्ष घाला. नीट परीक्षांचा विषय आणि त्यातला गोंधळ हा काही सोपा विषय नाही. या परीक्षेतील घोळाने लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याची वाट लागली आहे. आणि हे आताच घडले आहे असे नाही याच्या आधी पण असे प्रकार घडले आहेत आणि हा विषय राजकीय नाही आहे. हा विषय सामाजिक आहे.

## कृषी वीजबिल माफी अदानीसाठी : सपकाळ

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्य सरकारने जाहीर केलेली ४८ हजार कोटींची वीजबिल माफी ही शेतकऱ्यांच्या हितासाठी नसून उद्योगपती गौतम अदानी यांच्या फायद्यासाठी असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. राज्य वीज मंडळाच्या चारही कंपन्यांचे खासगीकरण करून त्या कंपन्या अदानीला आंदण द्यायच्या आहेत असा आरोप त्यांनी केला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी भाजपच्या किसान मोर्चाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार सोहळ्यात बोलताना शेतकऱ्यांचे थकीत ४८ हजार कोटींचे वीजबिल माफ करण्यात येत असल्याची घोषणा केली होती. या घोषणेचा सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना समाचार घेतला. सरकारने शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली असली तरी तिची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. त्यानंतर वीजबिल माफीची घोषणा करण्यात आली असली तरी ती दिशाभूल करणारी आहे. ही योजना शेतकऱ्यांसाठी नसून वीज वितरण क्षेत्राचे खासगीकरण करण्याच्या सरकारच्या धोरणाचा भाग आहे. एमएसईबीच्या चारही कंपन्या खासगी हातात देऊन त्याचा लाभ अदानी समूहाला मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.

केंद्र सरकारच्या प्रस्तावित मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर टीका करताना सपकाळ म्हणाले की हे विधेयक देशाच्या एकात्मतेसाठी घातक आहे.

भाजपला वन नेशन, वन पॉलिटिकल पार्टी अशी व्यवस्था निर्माण करायची असून या विधेयकाद्वारे उत्तर आणि दक्षिण भारतात राजकीय दरी निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी काँग्रेसने कायम ठेवली असून राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली छात्रों की गुंज अभियान सुरू आहे.

# अमेरिकेने इराणवर हल्ले वाढवले



**वृत्तसंस्था, तेहरान**

अमेरिकेने गुरुवारी पहाटेपासून इराणविरुद्धच्या हल्ल्यांची तीव्रता वाढवली आणि उत्तरेकडील लक्ष्यांवर मारा केला. तसेच अमेरिकन सैन्याने नाकेबंदी तोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका जहाजावरही गोळीबार केला. या जहाजावर इस्लामिक प्रजासत्ताकावरील (इराणवरील) अमेरिकेची नाविक नाकेबंदी तोडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याला प्रत्युत्तर देत इराणने बहारीन, जॉर्डन आणि कुवेतला लक्ष्य करून क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे हल्ले केले.

मध्य पूर्वेतील अमेरिका आणि इराण यांच्यातील गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या हल्ल्यांमुळे आणि होर्मुझ सामुद्रधुनीबाबतच्या नव्याने निर्माण झालेल्या संघषार्मुळे इराण युद्ध संपवण्यासाठी झालेला सामंजस्य करार मोडीत निघाला आहे. यामुळे हा प्रदेश पुन्हा एकदा युद्धाच्या उंबरठ्यावर उभा आहे. इराणच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अमेरिकेच्या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत ३५ हून अधिक लोक मारले गेले आहेत आणि ३०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. आता पहिल्यांदाच इराणची राजधानी तेहरानच्या आसपासच्या भागांवरही हल्ले झाले. कच्च्या वाढत्या किमतींमुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचा रिपब्लिकन पक्ष यांच्यासमोर एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

नोव्हेंबरमधील निवडणुकां मध्ये काँग्रेसवरील (संसदेवरील) आपले वर्चस्व कायम राखण्याची त्यांची आशा आहे. मात्र, हा होर्मुझ सामुद्रधुनीचा जलमार्ग पुन्हा खुला करण्यात वॉशिंग्टनला अपयश आले. त्यामुळे ट्रम्प यांनी बुधवारी पुन्हा एकदा नाविक नाकेबंदी लागू केली.

इराणच्या संसदेचे अध्यक्ष आणि मुख्य वातार्कार मोहम्मद बागेर गालीबाफ यांनी सांगितले की, अमेरिकेने सामंजस्य करारातील अटींचे पालन केले नाही, तर इराण पूर्ण-प्रमाणावरील लष्करी संघर्षासाठी सज्ज आहे. तसेच, इराणच्या निमलष्करी रिव्होल्युशनरी गार्डने नाकेबंदीच्या मुद्यावरून आखाती देशातून होणारी सर्व ऊर्जा-निर्यात थांबवण्याची धमकी दिली आहे.

ट्रम्प यांनी पुन्हा एकदा असा दावा केला की इराण शांतता करार करण्यास तयार आहे. मात्र, त्यांनी याबद्दल अधिक तपशील दिला नाही. आम्ही जे करत आहोत ते त्यांना आवडत नाही आणि त्यांना समझौता करायचा आहे. आम्ही त्यांच्याशी समझौता करणार आहोत की हा विषय कायमचा संपवणार आहोत, हे लवकरच स्पष्ट होईल असे त्यांनी बुधवारी पेनसिल्व्हेनिया येथील यूएस आर्मी वॉर कॉलेजमध्ये सांगितले. मात्र, दोन्ही देशातील संघर्ष सतत वाढत असल्याने आखाती देश पुन्हा युद्धाच्या उंबरठ्यावर उभा आहे.

## प्रत्येक नागरिकाचे आयुष्य मौल्यवान : कोर्ट




**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

कोणत्याही नागरिकाचे आयुष्य मौल्यवान असते आणि ते वाचवण्यासाठी शासकीय प्राधिकरणांनी सर्व प्रयत्न केले पाहिजेत, अशा शब्दांत दिल्ली उच्च न्यायालयाने कार्यकर्त्यांच्या आरोग्याबाबत महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत दिल्लीतील जंतरमंतर येथे उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीचे शासकीय डॉक्टरांकडून दररोज निरीक्षण केले जावे आणि त्यांचे प्राण वाचवण्यासाठी सर्व आवश्यक ते वैद्यकीय प्रयत्न केले जावेत, असा स्पष्ट आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र आणि दिल्ली सरकारला दिला आहे.

पेपरफुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील अनियमिततेच्या मुद्यावरून कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात सहभागी होत वांगचुक २८ जूनपासून बेमुदत उपोषणावर बसले आहेत. या उपोषणादरम्यान त्यांची प्रकृती झपाट्याने खालावली असून त्यांचे वजन तब्बल ८.५ किलोने घटले आहे. त्यांच्या जिवाला असलेला धोका लक्षात घेऊन, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करून सक्तीने अन्न दिले जावे, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठाने एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

संपादकीय लेखणीतून...

# उपान्त्य सामना विलक्षण

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी मध्यरात्री (भारतीय वेळेनुसार बुधवारी १२.३० वाजता) फ्रान्स आणि स्पेन या दोन युरोपियन खंडातील फुटबॉल महासत्तांमध्ये पहिला उपान्त्य सामना विलक्षण रंगला. आक्रमणावर भर देणारा फ्रान्स आणि भक्कम बचाव करणारा स्पेन यांच्यातील जुगलबंदीकडे साऱ्यांचे लक्ष लागले होते. यंदाच्या स्पर्धेत स्पेनने अवघा एक गोल खाल्ला आहे. यावरून त्यांचा भक्कम बचाव लक्षात येतो. एम्बाप्पे विरुद्ध उनाई सिमॉन, लॅमिन यमाल यांच्यातील द्वंद्व निर्णायक ठरणार होते. फिफा विश्वचषकाचा थरार गत महिनाभरापासून सुरू असून आता ही स्पर्धा उपान्त्य फेरीच्या टप्प्यावर आहे. फ्रान्स, मोरोक्को, स्पेन, बेल्जियम, इंग्लंड, नॉर्वे, अर्जेंटिना व स्वित्झर्लंड या आठ संघांनी उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला होता.

त्यापैकी फ्रान्स, स्पेन, इंग्लंड व अर्जेंटिना या संघांनी आगेकूच केली, तर अन्य चार संघांची वाटचाल संपुष्टात आली. फ्रान्सने सलग तिसऱ्यांदा विश्वचषकाची उपान्त्य फेरी गाठली आहे. १९९८ व २०१८ च्या विजेत्या फ्रान्सला २०२२ मध्ये अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागला होता. फ्रान्स हा सलग तीन विश्वचषकांत किमान उपान्त्य फेरी गाठणारा तिसरा देश ठरला. यापूर्वी ब्राझील व जर्मनीने अशी कामगिरी केली होती. रॉड्रीच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या स्पेनने यंदा साखळी फेरीत ह-गटातून अग्रस्थानासह आगेकूच करताना सौदी अरेबिया व उरुग्वे संघांना धूळ चारली तर केप व्हर्डेविरुद्ध बरोबरी पत्करली. त्यानंतर बाद फेरीत (राऊंड ऑफ ३२) ऑस्ट्रियाला ३-० असे पराभूत केले. उपउपान्त्यपूर्व लढतीत रोनाल्डोच्या पोतुर्गालचा स्वप्नभंग करताना १-० असा विजय मिळवला. या पाचही लढतींत स्पेनने एकही गोल स्वीकारला नव्हता. उपान्त्यपूर्व फेरीत बेल्जियमविरुद्ध त्यांनी २-१ असा विजय मिळवला मात्र, गोल न खाण्याची मालिका खंडित झाली. स्पेनने २०१० नंतर प्रथमच उपान्त्य फेरी गाठली.

स्पेनचा गोलरक्षक सिमॉनसह अन्य बचावपटूंना भेदण्यात बेल्जियम व्यतिरिक्त कोणालाही यश मिळाले नव्हते. त्यामुळे स्पेनच्या बचावफळीविरुद्ध फ्रान्सच्या आक्रमकांचा कस लागणार होता. मंगळवारी झालेल्या अत्यंत चुरशीच्या उपान्त्य फेरीच्या सामन्यात स्पेनने जेतेपदाचा प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या फ्रान्सचा २-० असा पराभव केला. या शानदार आणि नियंत्रित कामगिरीच्या जोरावर स्पेनने फिफा विश्वचषकाच्या फायनलमध्ये प्रवेश केला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच स्पेनने चेंडूवर नियंत्रण ठेवले. मिकेल ओयारझाबाल याने मिळालेल्या पेनल्टीवर पहिला गोल करून स्पेनचे खाते उघडले. उत्तरार्धात पेड्रो पोरो याने दुसरा गोल करत संघाची आघाडी दुप्पट केली. एम्बाप्पे, उस्मान डेम्बेल, मायकल ओलीस ही फ्रान्सची आक्रमक फळी स्पेनच्या शिस्तबद्ध बचावासमोर पूर्णपणे हतबल ठरली. स्पेनला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात गोलकीपर उनाई सायमनचा अभेद्य बचाव आणि यंग सेन्सेशन १९ वर्षीय यमालचा खेळ कारणीभूत ठरला. सायमनने एम्बाप्पेचे धोकादायक हल्ले उधळून लावले तर तरुण खेळाडू यमालच्या पदलालित्यामुळे स्पेनला पहिली पेनल्टी मिळाली शिवाय त्याने आक्रमणासोबतच उत्कृष्ट बचावही केला. संपूर्ण स्पर्धेत स्पेनच्या बचावफळीने एकमेव गोल स्वीकारला आहे. अंतिम फेरीत दाखल होणारा स्पेन हा पहिला संघ ठरला आहे. अर्जेंटिना आणि इंग्लंड संघात उपान्त्य फेरीचा दुसरा सामना होणार आहे.

बुधवारी मध्यरात्री (भारतीय वेळेनुसार गुरुवारी १२.३०) होणाऱ्या या सामन्यात कोणता संघ बाजी मारतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ॲटलांटा स्टेडियमवर रंगणाऱ्या या लढतीत लिओनेल मेस्सी विरुद्ध हॅरी केनचे कडवे आव्हान असेल. गतविजेत्या अर्जेंटिनाने साखळीत सलग तीन विजय मिळवताना अल्जेरिया, ऑस्ट्रिया व जॉर्डन संघांना धूळ चारली होती. त्यानंतर राऊंड ऑफ ३२ मध्ये केप व्हर्डे आणि उपउपान्त्य फेरीत ईजिप्तविरुद्ध ३-२ असा विजय मिळवला होता. उपान्त्यपूर्व सामन्यात अतिरिक्त वेळेत स्वित्झर्लंडवर ३-१ अशी मात केली होती. अर्जेंटिना गत काही सामन्यांत २ ते ३ गोल करत असला तरी १-२ गोलही खात आहे. म्हणजेच त्यांचा बचाव कमकुवत आहे. त्यामुळे इंग्लंडविरुद्ध अर्जेंटिनाच्या बचावफळीचा कस लागेल. अर्जेंटिनाने विश्वचषकातील सलग १२ सामन्यांत दोन किंवा त्याहून अधिक गोल केले आहेत. त्यांनी उरुग्वेचा ७४ वर्षांपूवीचा ११ सामन्यांचा विक्रम मोडला आहे. १९६६च्या विजेत्या इंग्लंडने साखळीत क्रोएशिया व पनामाला हरवले तर घानाविरुद्ध बरोबरी पत्करली. बाद फेरीत काँगोविरुद्ध २-१ तर मेक्सिकोविरुद्ध ३-२ असा विजय मिळवला. उपान्त्यपूर्व फेरीत नॉर्वेला २-१ असे नमवून चौथ्यांदा उपान्त्य फेरीत प्रवेश केला. अर्जेंटिनाने १९८६ मध्ये उपान्त्यपूर्व फेरीत दिएगो मॅराडोनाच्या हॅण्ड ऑफ गॉड गोलद्वारे इंग्लंडला पराभूत केले होते. त्या पराभवाचे शल्य इंग्लंडच्या चाहत्यांच्या मनात आजही कायम असेल. आता इंग्लंड त्या पराभवाची सव्याज परतफेड करणार की अर्जेंटिना सलग दुस-यांदा अंतिम फेरीत धडक मारणार याची जगभरातील फुटबॉलप्रेमींना उत्सुकता आहे.

इंग्लंडचा कर्णधार केनने यंदाच्या स्पर्धेत ६ गोल केले असून तो गोल्डन बूटच्या शर्यतीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. इंग्लंडचा मध्यरक्षक बेलिंघमसुद्धा फॉर्मात येतोय. अर्जेंटिनाने सहाव्यांदा तर इंग्लंडने चौथ्यांदा विश्वचषक स्पर्धेची उपान्त्य फेरी गाठली आहे. विश्वविजेतेपद टिकवायचे अर्जेंटिनाचे स्वप्न आहे तर सहा दशकांनंतर पुन्हा विश्वचषक जिंकण्याची इंग्लंडची महत्त्वाकांक्षा आहे. अर्जेंटिना आणि इंग्लंडमध्ये विळ्या-भोपळ्याचे सख्य आहे. फॉकलंड बेटावरून दोन्ही देशांत वाद आहे. त्यामुळे क्रिकेटमध्ये भारत-पाकिस्तान लढती जशा गाजतात तशा अर्जेंटिना-इंग्लंड लढतीही गाजतात. अर्जेंटिनाचे कोच स्कालोनी यांनी मात्र या ऐतिहासिक पार्श्वभूमीला फारसे महत्त्व दिलेले नाही. हा फक्त फुटबॉलचा सामना आहे एवढाच विचार आम्ही करतो असे ते म्हणाले.

# 'मेघदूताची' जन्मभूमी आणि कालिदासांची काव्यनगरी : रामटेक

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

**'आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श'**

आषाढ महिन्याच्या पहिल्याच दिवशी, पर्वताच्या शिखराला कवेत घेणाऱ्या आणि एखाद्या हत्तीप्रमाणे क्रीडारत दिसणाऱ्या मेघाला यक्षाने पाहिल, असा या श्लोकाचा अर्थ आहे.

भारतीय साहित्याचे सुवर्णपान आणि संस्कृत भाषेचे शिरोमणी महाकवी कालिदास यांच्या लेखणीतून उतरलेले 'मेघदूत' हे केवळ एक काव्य नाही, तर ती मानवी भावना आणि निसर्गाची एक अजरामर जुगलबंदी आहे. दरवर्षी' आषाढ शुद्ध प्रतिपदेला "महाकवी कालिदास दिन" साजरा केला जातो. ब१४ जुलै २०२६ रोजी 'आषाढ शुद्ध प्रतिपदा' म्हणजेच 'महाकवी कालिदास दिन' असतो. या दिनाचे आणि या महाकाव्याचे मूळ विदर्भातील नागपूर जिल्ह्यातील ऐतिहासिक आणि पावन अशा 'रामटेक' (प्राचीन रामगिरी) भूमीत रुजलेले आहे. निसर्गाचे बदलणारे रूप आणि मानवी मनातील विरहाची आर्तता यांचा सुंदर मिलाफ घडवून आणणाऱ्या या वाङ्मयीन वारशाचा नागपूरकरांना नक्कीच अभिमान आहे.

**'मेघदूत'ची मध्यवर्ती संकल्पना: विरह आणि निसर्गाचा सांगावा:**


'मेघदूत' या खंडकाव्याची कथा एका विरहाने व्याकुळ झालेल्या 'यक्षाभोवती' फिरते. अलकापुरीचा अधिपती आणि धनपती कुबेर यांच्या दरबारात हा यक्ष सेवेकरी असतो. त्याचे नुकतेच लग्न झालेले असते आणि तो आपल्या अतिशय सुंदर पत्नीच्या प्रेमात इतका मग्न असतो की, त्याचे स्वामीकार्याकडे, कुबेरांच्या सेवेकडे पूर्णपणे दुर्लक्ष होते. या बेधुंदपणामुळे त्याच्याकडून एक मोठी घोडचूक होते, ज्यामुळे संतप्त होऊन कुबेर त्याला एक वर्षासाठी पत्नी विरहाचा कठोर शाप देतात आणि अलकापुरीतून हाकलून लावतात.

**रामगिरीवर वास्तव्य:** शापग्रस्त झालेला हा यक्ष प्रभू श्रीरामांच्या चरणस्पशार्ने पावन झालेल्या आणि सीतेच्या स्नानाने पवित्र जल असलेल्या 'रामगिरी' आजचे रामटेक पर्वतावर येऊन राहू लागतो. दिवसेंदिवस पत्नीच्या आठवणीने तो खंगून जातो.

मेघाला दूत बनवण्याची कल्पना सत्यात उतरवत असतानाच आषाढ महिन्याचा पहिला दिवस उजाडतो. आकाशात काळेभोर ढग दाटून येतात. यक्षाला रामगिरीच्या शिखरावर उत्तरेकडे जाणारा एक विशाल मेघ दिसतो. तो मेघ पाहून यक्षाची विरहव्याकुळता शिगेला पोहोचते. त्याला एक अद्भुतरम्य कल्पना सुचते–हा मेघ उत्तरेकडे आपल्या अलकापुरीत जाईल! तो त्या निर्जीव मेघालाच आपला दूत म्हणजेच संदेशवाहक बनवतो आणि आपल्या प्रियतमा पत्नीपर्यंत आपली विरहव्यथा आणि जिवंत असण्याचा संदेश पोहोचवण्याची आर्त विनंती करतो.

**ऐतिहासिक संदर्भ आणि कालिदासांचे विदर्भातील वास्तव्य:**

इतिहासकार आणि साहित्यिक संशोधकांच्या मते, महाकवी कालिदास, इ.स. ४ थे शतक हे मूळचे उज्जयिनीचे (उज्जैन) होते. ते गुप्त घराण्यातील पराक्रमी सम्राट द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्य, इ.स. ३७५-४१३ यांच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक प्रमुख रत्न होते. मग त्यांचा



विदर्भाशी संबंधामागे एक रंजक ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

राजकीय आणि कौटुंबिक संबंध पाहता सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्य यांची कन्या प्रभावती गुप्त यांचा विवाह विदर्भातील बलशाली वाकाटक घराण्याचे राजे दुसरे नरेश रुद्रसेन यांच्याशी झाला होता. परंतु, लग्नानंतर काही वर्षांतच राजा रुद्रसेन यांचा अकाली मृत्यू झाला. रुद्रसेन यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा 'प्रवरसेन' हा अल्पवयीन होता. त्यामुळे प्रभावती गुप्त यांच्यावर राज्याची जबाबदारी आली. आपल्या कन्येला राज्यकारभारात मदत करण्यासाठी आणि राजपुत्राच्या उच्च शिक्षणासाठी सम्राट चंद्रगुप्तांनी आपल्या दरबारातील काही विद्वानांना विदर्भात पाठवले. त्यानंतर तिथल्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी त्यांनी स्वतः महाकवी कालिदासांना पाठवले आणि कालिदासांचे विदर्भात आगमन झाले.

त्याकाळी वाकाटकांची राजधानी 'नंदिवर्धन' म्हणजेच आजचे नागपूर जवळील नगरधन ही होती, जी रामटेकपासून अगदी हाकेच्या अंतरावर आहे. वाकाटकांच्या दरबारात राहत असताना कालिदासांचे रामगिरीवर जाणे-येणे असायचे. नंदिवर्धन ते रामगिरीचा प्रवासात, असे मानले जाते की, या विदभार्तील वास्तव्यादरम्यान कालिदासांना स्वतःच्या पत्नीचा जो विरह सहन करावा लागला, त्या आत्मानुभूत विरहव्यथेतूनच रामगिरीच्या एका शांत शिळेवर बसून त्यांनी 'मेघदूत' या काव्याची निर्मिती केली. त्यांनी काव्यात स्वतःऐवजी 'यक्ष' ही काल्पनिक व्यक्तिरेखा वापरली, पण त्यातील विरहभावना मात्र स्वतःचीच होती.

**कालिदास: केवळ कवी नव्हे, तर बहुआयामी प्रज्ञावंत**

कालिदास हे इतिहासातील एक न उलगडलेले कोडं असले, तरी त्यांच्या साहित्याचा अभ्यास केला की जाणवते की ते केवळ एक कवी नव्हते, तर एक अष्टपैलू प्रज्ञावंत होते:

**अचूक भूगोलतज्ज्ञ:**

'मेघदूत'मध्ये यक्षाने मेघाला रामगिरीपासून अलकापुरी पर्यंतचा जो रस्ता सांगितला आहे, तो थक्क करणारा आहे. त्या मार्गातील नद्या नर्मदा, वेत्रवती, पर्वत आम्रकूट, कैलास, शहरे उज्जयिनी, विदिशा यांचे भौगोलिक वर्णन आजच्या आधुनिक नकाशाशी तंतोतंत जुळते. विमान प्रवास उपलब्ध नसलेल्या काळात कालिदासांनी केलेली ही भौगोलिक मांडणी त्यांच्या अफाट ज्ञानाची साक्ष देते. निसर्गातील ऋतूंचे बदल, वनस्पती, प्राण्यांचे वर्तन आणि ढगांची निर्मिती धूर, ज्योती, पाणी आणि वायू यांचे मिश्रण याबद्दलची त्यांची निरीक्षणे वैज्ञानिक दृष्टिकोनाला धरून आहेत. ते निसर्गप्रेमी आणि वैज्ञानिक होते. ते मानसशास्त्रज्ञ जाणणारे होते. मानवी मनातील भावनांचा, प्रेमाचा, मीलनाचा आणि विरहाचा इतका सूक्ष्म अभ्यास असणारा कवी विरळाच. 'अभिज्ञान शाकुंतलम्', 'रघुवंशम्', 'ऋतुसंहारम्', 'कुमारसंभवम्' अशा त्यांच्या सर्वच कलाकृती मानवी स्वभावाचे विविध पैलू उलगडतात.

**विदर्भाचा अभिमान आणि रामटेकचा सांस्कृतिक वारसा:**

हे अद्भुत महाकाव्य आपल्या नागपूर जिल्ह्यात लिहिले गेले, ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. या ऐतिहासिक आणि साहित्यिक वारशाचे जतन करण्यासाठी रामटेक येथे खालील महत्त्वपूर्ण गोष्टी आकारास आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन आणि थोर अभ्यासक ज्ञानयोगी स्व. डॉ. श्रीकांतजी जिचकार यांच्या विशेष पुढाकारातून १९८० च्या दशकात रामटेकच्या टेकडीवर महाकवी कालिदास स्मारक या देखण्या स्मारकाची निर्मिती करण्यात आली. उत्कृष्ट वालुकामय पाषाणाद्वारे Sandstone तयार केलेले हे वर्तुळाकार स्मारक स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

या स्मारकाच्या सभोवताली 'ओंकार उद्यान' विकसित करण्यात आले आहे. या उद्यानाच्या भिंतींवर महाकवी कालिदास यांच्या 'मेघदूत', 'शाकुंतलम्' आणि 'रघुवंशम्' या अजरामर काव्यकृतींवर आधारित अत्यंत सुंदर भित्तीचित्रे कोरण्यात आली आहेत, जी पर्यटकांना आणि साहित्याच्या विद्यार्थ्यांना भुरळ घालतात.

संस्कृत भाषेचे संवर्धन व्हावे, प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा टिकून राहावी आणि या भाषेचा उच्च शिक्षणात प्रसार व्हावा, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने सन १९९७ मध्ये रामटेक येथे कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ या प्रसिद्ध विद्यापीठाची स्थापना केली. आज हे विद्यापीठ देशभरात संस्कृतच्या प्रसाराचे मोठे केंद्र बनले आहे.

महाकवी कालिदास यांच्या साहित्याचे जागतिक मोल लक्षात घेऊन, भारत सरकारने सन १९६० मध्ये त्यांच्या सन्मानार्थ आणि 'मेघदूत' महाकाव्यावर आधारित एक विशेष टपाल तिकीट प्रकाशित केले होते.

आजच्या डिजिटल आणि सोशल मीडियाच्या युगात, जिथे संदेश सेकंदात पोहोचतात, तिथे शतकांपूर्वी मेघाला दूत बनवून पाठवलेला हा सांगावा आजही तितकाच ताजा आणि मनाला स्पर्श करणारा वाटतो. 'मेघदूत' हे केवळ विरहाचे काव्य नाही, तर ते माणसाचे निसर्गाशी असलेले अतूट नाते दर्शवते. नव्या पिढीसाठी साहित्याचा पाझर फोडण्याचे काम या संदेशाचे कार्य आहे. दरवर्षी आषाढाच्या पहिल्या दिवशी जेव्हा पाऊस येतो, तेव्हा कालिदासांच्या शब्दांची आठवण येणे अगदी स्वाभाविक आहे.

कालिदास दिनाच्या निमित्ताने आयोजित होणाऱ्या विविध सांस्कृतिक आणि साहित्यिक कार्यक्रमांमुळे हा प्रगल्भ साहित्याचा झरा नव्या पिढीपर्यंत पाझरत राहतो. विदर्भाच्या वैभवात भर घालणारे रामटेकचे कालिदास स्मारक हे केवळ एक पर्यटन स्थळ नसून, ते भारतीय संस्कृतीच्या, प्रतिभेच्या आणि अभिजात साहित्याचे एक पवित्र तीर्थक्षेत्र आहे.

- ९५६१५९४३०६

# आयसीसी स्पर्धांच्या संरचनेत अमूलाग्र बदल

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

आयसीसीने २०२७ च्या पुरुष एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या स्वरूपात मोठा बदल केला आहे. दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे आयोजित होणाऱ्या या स्पर्धेत १४ संघ सहभागी होतील, परंतु प्रथमच 'सुपर सिरीज' आणि 'सुपर ७' सारखे नवीन टप्पे समाविष्ट केले जातील. आयसीसीच्या मते, स्पर्धेतील सुरुवातीचे सामने अधिक महत्त्वाचे आणि रोमांचक बनवण्याच्या उद्देशाने हे बदल करण्यात आले आहेत.

तसेच, टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या स्वरूपातही बदल करण्यात आले आहेत. चला, दोन्ही स्वरूपांमधील बदलांवर एक-एक करून नजर टाकूया. प्रथम, एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या स्वरूपातील बदलांविषयी जाणून घेऊया, त्यानंतर टी-२० विश्वचषक स्पधेर्तील बदलांविषयी. एकदिवसीय विश्वचषक २०२७ मध्ये, तर पुढील टी-२० विश्वचषक २०२८ मध्ये आयोजित होणार आहे.

**२०२३ च्या विश्वचषकाचे स्वरूप काय होते?**

भारतात खेळल्या गेलेल्या २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात केवळ १० संघ सहभागी झाले होते. त्याचे स्वरूप खूप सोपे होते. सर्व १० संघांनी एकमेकांविरुद्ध एक सामना खेळला. याचा अर्थ प्रत्येक संघाने नऊ साखळी सामने खेळले. गुणतालिकेतील अव्वल चार संघ थेट उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले. त्यानंतर अंतिम सामना खेळला गेला. याचा अर्थ बाद फेरीपूर्वी फक्त एकच साखळी टप्पा होता. दुसरी फेरी नव्हती. २०२७ च्या विश्वचषकात नवीन काय असेल? २०२७ मध्ये १४ संघ सहभागी होतील, परंतु सर्वच संघ थेट गट टप्प्यात प्रवेश करणार नाहीत. चला जाणून घेऊया...

**पहिला टप्पा: सुपर सिरीज**

१४ संघांपैकी, आयसीसी क्रमवारीत सर्वात कमी रँक असलेले तीन संघ प्रथम सुपर सिरीज खेळतील. नवीन स्वरूपानुसार, क्रमवारीत १२व्या ते १४व्या क्रमांकावर असलेले तीन संघ प्रथम सुपर सिरीज खेळतील. या टप्प्यातून फक्त एकच संघ पुढे जाईल, तर दोन संघ स्पर्धेतून बाद होतील. हे तीन संघ एकमेकांविरुद्ध स्पर्धा करतील. यापैकी फक्त एकच संघ पुढच्या टप्प्यात जाईल. उरलेले दोन संघ स्पर्धेतून बाद होतील. याचा अर्थ असा की १४ संघांची नावे जाहीर केली जातील, परंतु मुख्य स्पर्धा १२ संघांसह सुरू होईल.

**दुसरा टप्पा: गट फेरी**

सुपर सिरीजनंतर उरलेल्या १२ संघांची दोन गटांमध्ये विभागणी केली जाईल.

**गट अ - ६ संघ आणि गट ब - ६ संघ**

प्रत्येक संघ आपल्या गटातील उर्वरित पाच संघांविरुद्ध खेळेल.

**तिसरा टप्पा: सुपर ७**

स्वरूपातील हा सर्वात मोठा बदल आहे. दोन्ही गटांमधून: अव्वल तीन संघ थेट सुपर ७ मध्ये प्रवेश करतील. याचा अर्थ सुपर ७ साठी सहा संघ निश्चित झाले आहेत. याव्यतिरिक्त, दोन्ही गटांमधील चौथ्या स्थानावरील संघांपैकी, ज्या संघाची कामगिरी चांगली असेल, म्हणजेच गुण समान असल्यास, तो संघ देखील पात्र ठरेल. हे फिफा विश्वचषक २०२६ प्रमाणेच आहे, जिथे प्रत्येक गटातील सर्वोत्तम दोन संघ नॉकआऊट फेरीसाठी पात्र ठरतात आणि तिसऱ्या स्थानावरील सर्वोत्तम संघ देखील नॉकआऊट फेरीसाठी पात्र ठरतो. त्याचप्रमाणे, सहा संघ सुपर ७ मध्ये प्रवेश करतील. शिवाय, प्रत्येक गटातील चौथ्या क्रमांकावरील संघ सुपर ७ मध्ये प्रवेश करेल. याचा अर्थ सुपर ७ मध्ये एकूण सात संघ खेळतील. हे सर्व सात संघ एकमेकांविरुद्ध खेळतील आणि गुणतालिकेच्या आधारावर अव्वल चार संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील.

**चौथा टप्पा: उपांत्य फेरी आणि अंतिम सामना**

सुपर ७ मधील अव्वल चार संघ उपांत्य फेरी खेळतील. उपांत्य फेरीतील विजेते अंतिम सामन्यात एकमेकांविरुद्ध खेळतील.

**मूळ योजना काय होती, आणि आता त्यात काय बदल झाला आहे?**

आयसीसीने जून २०२१ मध्ये २०२७ च्या विश्वचषकात १४ संघ खेळवण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी, २०१९ आणि २०२३ चे विश्वचषक १० संघांसह खेळले गेले होते. सुरुवातीच्या योजनेनुसार, १४ संघांना प्रत्येकी सात संघांच्या दोन गटांमध्ये विभागले जाणार होते. त्यानंतर सुपर ६ फेरी, त्यानंतर उपांत्य फेरी आणि अंतिम सामना होणार होता. नवीन स्वरूपानुसार आता सुपर सिरीज आणि त्यानंतर केवळ १२ संघांचा समावेश असलेला मुख्य गट टप्पा असेल. या गट टप्प्यात एकूण ३० सामने असतील.

**आयसीसीने हा बदल का केला?**

आयसीसीच्या मते, नवीन स्वरूपामुळे सुरुवातीच्या सामन्यांचे महत्त्व वाढेल. पूर्वी, काही संघ सुरुवातीच्या पराभवातून सावरू शकत होते, पण आता कमकुवत संघांना सुरुवातीलाच आपली योग्यता सिद्ध करावी लागेल. प्रत्येक गट सामना अधिक मौल्यवान होईल. सुपर ७ मध्ये पोहोचण्याची शर्यत अधिक रोमांचक होईल. स्पर्धेच्या अखेरीस उपांत्य फेरीच्या शर्यतीत अधिक संघ टिकून राहू शकतील.

आयसीसीने याचे वर्णन 'परिणाम वाढवण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल' असे केले आहे, म्हणजेच यामुळे सुरुवातीचे सामने अधिक निर्णायक आणि महत्त्वाचे बनतील. आयसीसीच्या वार्षिक सभेत अशी चिंता व्यक्त करण्यात आली होती की, सुरुवातीच्या टप्प्यातील अनेक सामने औपचारिक बनू शकतात, ज्यामुळे स्टेडियममधील उपस्थिती कमी होण्याची शक्यता आहे. नुकत्याच झालेल्या टी२० विश्वचषकात, अनेक सामन्यांचे निकाल जवळपास पूर्वनिश्चित वाटत होते. त्यामुळे, संघांची संख्या कमी करण्याऐवजी, आयसीसीने पहिल्या फेरीत अधिक स्पर्धात्मक टप्पा जोडण्याचा निर्णय घेतला.

**आयसीसीने काय म्हटले?**

आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे, "स्पर्धेच्या प्रत्येक टप्प्याचे महत्त्व वाढवण्यासाठी नवीन स्वरूप तयार करण्यात आले आहे. पहिल्या आणि दुसऱ्या फेरीतील प्रत्येक सामन्याचा अधिक प्रभाव असेल. सुपर ७ टप्पा अत्यंत स्पर्धात्मक असेल, ज्यामध्ये सात संघ उपांत्य फेरी गाठण्यासाठी साखळी सामने खेळतील." विश्वचषकाच्या स्वरूपात भूतकाळात अनेक बदल झाले आहेत. एकदिवसीय विश्वचषकाच्या स्वरूपात गेल्या काही वर्षांत वारंवार बदल झाले आहेत.

**२०११ विश्वचषक:** १६ संघ (दोन गट आणि त्यानंतर उपांत्य फेरी)

**२०१५ विश्वचषक:** १४ संघ (दोन गटांमध्ये विभागलेले आणि त्यानंतर उपांत्य फेरी)

**२०१९ आणि २०२३ विश्वचषक:** १० संघ (राऊंड रॉबिन आणि त्यानंतर उपांत्य फेरी)

**२०२७ विश्वचषक - १४ संघ, परंतु सुपर सिरीज आणि सुपर ७ सारख्या नवीन टप्प्यांसह**

अंतिम वेळापत्रक सप्टेंबरमध्ये ठरवले जाईल.

आयसीसीने सांगितले की, स्पर्धेचे अंतिम स्वरूप आणि संपूर्ण वेळापत्रक सप्टेंबरमध्ये होणाऱ्या बैठकीत ठरवले जाईल. या बैठकीत पुढील फ्युचर टूर प्रोग्रामवर (एफटीपी) देखील चर्चा केली जाईल. यावेळी यजमानपदाच्या व्यवस्थेत कोणताही बदल होणार नाही.

**नामिबिया:** ३ सामन्यांचे आयोजन करू शकते

**झिम्बाब्वे:** ८ ते १० सामन्यांचे आयोजन करू शकते

**दक्षिण आफ्रिका:** उर्वरित ४१ सामन्यांचे आयोजन करू शकते

**संघांची निवड कशी केली जाईल?**

१४ संघांची निवड कोणत्या प्रक्रियेने केली जाईल, हे आयसीसीने अद्याप स्पष्ट केलेले नाही. तथापि, अशी शक्यता आहे की: यजमान दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे यांना थेट प्रवेश मिळेल. उर्वरित संघ त्यांच्या एकदिवसीय क्रमवारीच्या आधारावर थेट पात्र ठरतील. काही संघ ग्लोबल क्वालिफायरद्वारे पात्र ठरतील. काही संघांना क्रिकेट विश्वचषक लीग २ च्या माध्यमातूनही संधी मिळेल. ग्लोबल क्वालिफायर २०२७ च्या सुरुवातीला होण्याची शक्यता आहे आणि त्याचे आयोजन नामिबिया किंवा दक्षिण आफ्रिका करू शकतात.

**कोणाला फायदा होईल आणि कोणाला तोटा?**

फायदा : - अधिक मजबूत संघांना अधिक स्पर्धात्मक सामने खेळायला मिळतील. स्पर्धा अधिक काळ रोमांचक राहील.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# भगवान मानमोडे आत्महत्या प्रकरणाला नवे वळण

## अनिल देशमुख यांची कुटुंबीयांना भेट, निष्पक्ष चौकशीची मागणी

### राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)ची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार


**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

खापा (घुडन), ता. नरखेड येथील भगवान किसना मानमोडे यांच्या आत्महत्या प्रकरणात आता नवे वळण आले असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)च्या वतीने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार सादर करण्यात आली आहे. जलालखेडा पोलीस ठाण्यातील काही पोलीस कर्मचाऱ्यांनी भगवान मानमोडे यांना बेदम मारहाण करून त्यांच्यावर रेती तस्करीचा खोटा गुन्हा दाखल केल्याचा गंभीर आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे. संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्याचे माजी गृहमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)चे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांनी भगवान मानमोडे यांच्या कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. कुटुंबीयांकडून संपूर्ण घटनेची माहिती जाणून घेत त्यांनी न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी (एसडीपीओ) यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून कोणत्याही दबावाला बळी न पडता निष्पक्ष व सखोल चौकशी करण्याची विनंती केली. याशिवाय नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांनाही निवेदन सादर करून संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.

तक्रारीनुसार, खापा (घुडन) येथील शेतकरी सतीश बंडूजी चोपडे यांच्या शासकीय अनुदानातून झालेल्या विहिरीच्या बांधकामानंतर उरलेली रेती ट्रॅक्टरने घरी आणण्यासाठी भगवान मानमोडे गेले होते. परतीच्या प्रवासात ट्रॅक्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ते दुरुस्ती करत असताना तेथून जाणाऱ्या पोलीस पेट्रोलिंग पथकाने चौकशी केली. ट्रॅक्टर बंद पडल्याचे सांगूनही पोलिसांनी कोणतीही खातरजमा न करता त्यांना बेदम मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, पोलिस वाहन चालक रवी मोहोड याच्यासह अन्य दोन कर्मचाऱ्यांनी सुरुवातीला मारहाण केली. त्यानंतर आणखी चार पोलीस कर्मचाऱ्यांना घटनास्थळी बोलावून पुन्हा मारहाण करण्यात आली. एवढ्यावरच न थांबता खापा येथील पोलीस पाटील यांना घटनास्थळी बोलावण्यात आले. त्यांच्या उपस्थितीत शेजारी राहणारे रुपेश महादेव मानमोडे यांच्याकडून ट्रॅक्टरमध्ये बळजबरीने आठ ते दहा घमेले रेती टाकण्यात आली. त्यानंतर भगवान मानमोडे यांच्याविरुद्ध रेती तस्करीचा खोटा गुन्हा दाखल करून ट्रॅक्टरसह रेती जलालखेडा पोलीस ठाण्यात आणल्याचा आरोप करण्यात आला आहे.


राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

अनिल देशमुख
माजी गृहमंत्री
महाराष्ट्र राज्य

प्रति,
मा. पोलीस अधीक्षक साहेब,
नागपूर ग्रामीण,नागपूर.
विषय:- जलालखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस कर्मचाऱ्यांकडून झालेल्या मारहाणीबाबत

महोदय,
खापा बु. ता. नरखेड येथील भगवान मानमोडे यांच्या आत्महत्येबाबत काही गंभीर प्रश्न कुटुंबीयांनी उपस्थीत केले आहे. मृतकाचे वडील श्री. किसना तुळशीराम मानमोडे (रा. खापा (बु), ता. नरखेड) यांच्यासह गावातील नाकरीकांनी मला दिलेल्या निवेदनानुसार श्री. सतिश बंडूजी चोपडे यांच्या शेतातील शासकीय अनुदान विहिरीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर उरलेली रेती घरी आणण्यासाठी तक्रारदार यांचा मुलगा भगवान किसना मानमोडे हा ट्रॅक्टर घेऊन गेला होता. रेती रिकामी करून परत येत असताना ट्रॅक्टरमध्ये बिघाड झाला. तो दुरुस्त करत असताना तेथून जाणाऱ्या पोलीस पेट्रोलिंग वाहनावरील कर्मचाऱ्यांनी त्याची चौकशी केली. ट्रॅक्टर दुरुस्त करत असल्याचे सांगूनही पोलीस कर्मचाऱ्यांनी भगवान मानमोडे याला बेदम मारहाण केली. नागरीकांनी मला केलेल्या तक्रारीनुसार पोलिस वाहनाचा चालक रवी मोहोड याने त्याच्यासोबत असलेल्या इतर दोन कर्मचाऱ्यांनी मारहाण तर केलीच, परंतु पोलिस स्टेशनमधील इतर चार पोलिस कर्मचाऱ्यांना दुसऱ्या गाडीने बोलवून परत भगवान यास मारहाण केली.

तसेच, पोलीस कर्मचाऱ्यांनी पोलीस पाटील (खापा) यांना बोलावून घेऊन, त्यांच्या इसमक्ष शेजारील व्यक्ती रुपेश महादेव मानमोडे याला ट्रॅक्टरमध्ये बळजबरीने ८ ते १० घमेले रेती टाकण्यास लावली आणि भगवान मानमोडे याच्यावर रेती तस्करीची खोटी तक्रार दाखल करून ट्रॅक्टर व रेती पोलीस स्टेशन जलालखेडा येथे आणली, असा गंभीर आरोप नागरीकांनी केला आहे. पोलीस कर्मचाऱ्यांकडून अशा प्रकारे सामान्य नागरिकाला बेदम मारहाण करणे आणि

भगवान मानमोडे यांच्या मृत्यूपूर्वी झालेल्या कथित मारहाणीमुळे त्यांच्यावर मानसिक दबाव निर्माण झाला होता का, तसेच या घटनेचा आत्महत्येशी काही संबंध आहे का, याची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांचे मोबाईल कॉल रेकॉर्ड, सीसीटीव्ही फुटेज, स्टेशन डायरी, पंचनामे आणि घटनेशी संबंधित सर्व कागदपत्रांची तपासणी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे खापा (घुडन) परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, भगवान मानमोडे यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि या प्रकरणातील सत्य लवकरात लवकर समोर यावे, अशी मागणी ग्रामस्थांसह विविध सामाजिक व राजकीय संघटनांकडून होत आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घातल्याने आता पोलीस प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

## डॉ. किरण मिडब्रेन अकादमीतर्फे 'इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड अँड वंडर बॉय रेकॉर्ड २०२६' भव्य गौरव सोहळा रविवारी

### किरण मिडब्रेन अकादमीतर्फे २९ इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार १९ जुलै रोजी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. किरण मिडब्रेन अकादमीच्या वतीने देशातील होतकरू व गुणवंत मुलांच्या अद्वितीय प्रतिभेला राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी 'इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड अँड वंडर बॉय रेकॉर्ड २०२६' या भव्य गौरव सोहळ्याचे आयोजन रविवार १९ जुलै रोजी, सायंकाळी ५ ते ७ या वेळेत करण्यात आले आहे. याप्रसंगी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या महाल येथील निवासस्थानी गडकरी वाडा येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीयमंत्री नितीन गडकरी उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते देशभरातील गुणवंत व विक्रमवीर मुलांचा सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला श्रीमंत डॉ. मुधोजी राजे भोसले (नागपूरचे महाराजा), आयपीएस लोहित मतानी (उपआयुक्त, महामार्ग), जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण तसेच नारायण एटेक्नो स्कूलच्या प्राचार्या डॉ. सुलक्षणा भुयार हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मुलांना इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड व वंडर बॉय रेकॉर्ड अंतर्गत ट्रॉफी, पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे, अनेक विद्यार्थ्यांनी डोक्यावर पट्टी बांधून डोळे बंद करून स्मरणशक्ती, एकाग्रता, ओळख क्षमता व विविध बौद्धिक स्पर्धांमध्ये आश्चर्यकारक कामगिरी करत वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केले आहेत.

अशा मुलांच्या असामान्य प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी हा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला असून, त्यांच्या आत्मविश्वासात व उत्साहात मोठी भर पडत आहे. याशिवाय सहभागी विद्यार्थ्यांची गुगल वेब लिस्टिंग, इंडिया टीव्हीवर थेट कव्हरेज तसेच इतर विशेष सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. डॉ. किरण मिडब्रेन अकादमीच्या या उपक्रमामुळे देशातील लहान मुलांच्या सुप्त गुणांना चालना मिळून त्यांना राष्ट्रीय स्तरावर स्वतःची ओळख निर्माण करण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

या प्रेरणादायी सोहळ्यास पालक, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बालकांच्या यशाचा गौरव करावा, असे आवाहन आयोजक डॉ. किरण काकडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

---

## लॉयड्स मेटल्सच्या स्टोअरवर मध्यरात्री हात साफ : ३.४५ लाखांचा औद्योगिक साहित्यसाठा चोरी

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**



बल्लारपूर तालुक्यातील नवीन दहेली (लावारी) येथे लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या बांधकामाधीन स्टोअरवर अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री धाड टाकत तब्बल ३ लाख ४५ हजार ५०० रुपयांचे औद्योगिक साहित्य लंपास केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणामुळे कंपनीच्या सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याप्रकरणी कंपनीचे एचआर मॅनेजर अंजनकुमार शंभुनाथ सिन्हा ६० वर्ष यांनी बल्लारपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, कंपनीने नवीन दहेली (लावारी) येथे भाडेतत्त्वावर घेतलेल्या जागेवर स्टोअर रूम व कार्यालयाचे बांधकाम सुरू असून टिनशेडच्या वरांड्यात वेल्डिंग साहित्य, गॅस सिलिंडर व इतर यंत्रसामग्री ठेवण्यात आली होती.

परिसराच्या सुरक्षेसाठी दोन सुरक्षा रक्षकही नियुक्त करण्यात आले होते. १२ जुलै रोजी सायंकाळी कामकाज संपल्यानंतर साहित्य नेहमीप्रमाणे सुरक्षित ठेवण्यात आले होते. मात्र १३ जुलै रोजी सकाळी सुमारे ८ वाजता स्टोअर इंचार्ज सोमेन कर्मकार यांनी पाहणी केली असता साहित्य गायब असल्याचे निदर्शनास आले. याबाबत सुरक्षा रक्षकांना विचारणा केली असता त्यांनी रात्री १ वाजल्यानंतर झोप लागल्याचे सांगितल्याची माहिती तक्रारीत नमूद करण्यात आली आहे.

चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये ३ एचपी कंपनीचे गॅस सिलिंडर, ९५ एमएमचे ११ बंडल कॉपर वेल्डिंग केबल, ५० एमएमचे ४ बंडल वेल्डिंग केबल तसेच १५ वेल्डिंग होल्डर यांचा समावेश असून त्याची एकूण किंमत ३,४५,५०० रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकरणी बल्लारपूर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केले असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत करीत आहे.

---

## पारशिवनी तालुक्यात आयुष्यमान कार्डशिवाय मिळतो राशन, तर मौदा तालुक्यात राशन घेण्यासाठी आयुष्यमान कार्ड अनिवार्य!

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**



जुलै महिन्यातील राशन घेण्यासाठी मौदा तालुक्यातील कोदामेंढी व तुमान सह इतर गावातील राशन कार्डधारक राशन घेण्यासाठी राशन दुकानात गेले असता राशन दुकानदार आयुष्यमान कार्ड आणायला सांगतो व ज्यांच्याकडे आयुष्यमान कार्ड आहे त्यांनाच राशन देतो. ज्यांच्याकडे आयुष्यमान कार्ड नाही त्यांना या महिन्यापासून राशन घेण्यासाठी आयुष्यमान कार्ड अनिवार्य असल्याने आधी आयुष्यमान कार्ड काढा नंतरच राशन घ्यायला या असे सांगत आहे.

तर ज्या राशन कार्ड धारकांकडे आयुष्यमान कार्ड नाही असे राशन कार्ड धारक आयुष्यमान कार्ड काढायला गेले असता, ग्रामपंचायतचे ऑपरेटर आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी आधार कार्ड ला मोबाईल लिंक असणे अनिवार्य असल्याचे सांगतो. ज्या राशन कार्ड धारकांच्या आधार कार्डशी मोबाईल लिंक नाही त्यांना आधी आधार केंद्रावर मोबाईल लिंक करण्यासाठी आधार कार्ड केंद्रावर चकरा माराव्या लागत असल्याचे तुमान येथील नागरिकांनी सांगितले.

मात्र आज गुरुवार (ता. १६ जुलै) मौदा तालुक्यातील सीमेलगत व पारशिवनी तालुक्याअंतर्गत येत असलेल्या निलज येथे सकाळी साडेदहा वाजता दरम्यान राशन कार्ड धारकांना धान्य वाटप करीत असताना राशन दुकानदार हटवार यांना विचारपूस केली असता, त्यांनी राशन कार्ड धारकांना राशन देण्यासाठी आयुष्यमान कार्ड ची अट अनिवार्य नसल्याने मी सर्वांनाच आयुष्यमान कार्ड असणाऱ्यांना व आयुष्यमान कार्ड नसणाऱ्यांना राशन वाटप करत असल्याचे सांगितले.

मौदा व पारशिवनी हे दोन्ही तालुके नागपूर जिल्ह्यात येतात. एका जिल्ह्यातील दोन तालुक्यात राशन घेण्यासाठी वेगवेगळे नियम असल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे व ज्यांना वेळेवरच आयुष्यमान कार्ड बनवण्यासाठी कधी विद्युत पुरवठा बंद असल्याने तर कधी लिंक नसल्याने आयुष्यमान कार्ड बनवणाऱ्या व आधारकार्ड मोबाईलची लिंक करणाऱ्या कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत असल्याने, मौदा तालुक्यातील आयुष्यमान कार्ड नसलेले राशन कार्डधारक मात्र चिंताग्रस्त दिसले.

---

## डोंगरगावच्या बुद्धभूमीच्या विकासासाठी समता सैनिक दलाचा पुढाकार

### बुद्धभूमी (गंधकुटी) पर्वत विकासासाठी खासदार निधीची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील डोंगरगाव येथील आयुष्मान ज्येष्ठ समाजसेवक गुलाबरावजी तागडे यांनी समाजहिताच्या उद्देशाने समता सैनिक दलाला दान दिलेल्या बुद्धभूमी (गंधकुटी) पर्वत परिसराचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी खासदार स्थानिक क्षेत्र विकास निधीतून आवश्यक आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात खासदार संजय राऊत (उद्धव बाळासाहेब ठाकरे - शिवसेना) यांना कु. अपूर्वाताई पिटलवार, जिल्हा विभागीय सचिव, लोकसभा रामटेक (उभाठा) तसेच समता सैनिक दल, नागपूर ग्रामीणच्या कायदेशीर सल्लागार यांच्या माध्यमातून सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, डोंगरगाव येथील बुद्धभूमी (गंधकुटी) पर्वत हे बौद्ध समाजाचे श्रद्धास्थान असून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धम्मप्रसाराच्या विविध उपक्रमांचे महत्त्वपूर्ण केंद्र आहे. समता सैनिक दलाच्या माध्यमातून येथे नियमितपणे धम्मप्रबोधन, सामाजिक जनजागृती, युवक-युवतींसाठी मार्गदर्शन शिबिरे तसेच विविध समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित केले जातात.

या परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सभागृह, संरक्षण भिंत (कंपाउंड), भव्य प्रवेशद्वार, पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह, विद्युत सुविधा, अंतर्गत रस्ते, वृक्षारोपण, बैठक व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा उभारणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या सुविधा उपलब्ध झाल्यास बुद्धभूमी परिसर अधिक विकसित होऊन सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धम्मकार्याला मोठी चालना मिळेल, असा विश्वास समता सैनिक दलाने व्यक्त केला आहे.



यावेळी खासदार संजय राऊत यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करून खासदार स्थानिक क्षेत्र विकास निधीतून आवश्यक आर्थिक सहाय्य मंजूर करावे, अशी नम्र अपेक्षा समता सैनिक दलाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

या निवेदनामागे समता सैनिक दल, दीक्षाभूमी नागपूर (ग्रामीण १) चे मार्गदर्शक घनश्यामजी फुसे, ज्येष्ठ समन्वयक श्री. राजरत्नजी कुंभारे, जिल्हाध्यक्ष विद्येश्वर गजबे (बंडूभाऊ), उपाध्यक्ष डॉ. सुनील नारनवरे, जिल्हा सचिव दीपक ढोके, मुख्य शाखा संघटक भागवतजी पाटील, शाखा संघटक विकास सोमकुवर, महिला कमांडर संध्या सहारे, सीनियर संघटक संगीता निकोसे, अनिता मेश्राम, शीलाताई पाटील, महानंदा नारनवरे, लीना पाटील, जयश्री गोंडणे, शारदा नारनवरे, शीलाताई निस्वादे, मनोज गजभिये आणि किशोर गजभिये यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

---

### थोडक्यात

## भिवापूरच्या निवीचा इंडिया वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झेंडा, आ. राजीव पोतदार यांच्या हस्ते गौरव



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

जिद्द, एकाग्रता आणि विलक्षण स्मरणशक्तीच्या बळावर भिवापूरच्या कु. निवी संदीप निंबार्ते हिने राष्ट्रीय स्तरावर आपल्या नावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. भारतीय चलनी नोटांवरील अनुक्रमांक डोळ्यांवर पट्टी बांधून अचूक व वेगाने वाचण्याच्या अनोख्या कौशल्याची दखल घेत तिची इंडिया वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली. या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार राजीव पोतदार यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. गौरव सोहळ्याला माजी आमदार सुधीर पारवे, भाजपचे जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत तसेच नागपूर सुधार प्रन्यासाचे विश्वस्त संदीप इटकेलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी निवीच्या कर्तृत्वाचे कौतुक करत तिच्या यशाचा गौरव केला. सत्कारानंतर निवीने उपस्थितांसमोर डोळ्यांवर पट्टी बांधून भारतीय चलनी नोटांवरील अनुक्रमांक अचूकपणे वाचून दाखवत आपल्या असामान्य स्मरणशक्तीचे थक्क करणारे प्रात्यक्षिक सादर केले. तिच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

निवीच्या या यशामुळे भिवापूर तालुक्याचे नाव राज्यासह देशभरात पोहोचले असून, परिसरासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे इतर विद्यार्थ्यांनाही आपल्या अंगी असलेल्या कौशल्यांचा सातत्याने विकास करण्याची प्रेरणा मिळेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## लागली नाही झळी, पावसाची दडी, दुबार पेरणीच्या संकटात सापडला शेतकरी गडी!



**दै. सिंहवाणी वृत्त, हिंगणा**

दोन चार दिवस पाऊस असा काही बरसला की वाटले आता झड लागते की काय त्या मुळे शेतकऱ्यांनी लगबगीने खरिपाच्या पेरण्या आटपून घेतल्या. परंतु गेल्या पंधरा दिवसांपासून पाऊस दडी मारून बसला. शेतकरी गडी सालाबादप्रमाणे दुबार पेरणीच्या संकटात सापडला आहे.सोयाबीन, कापूस चि लागवड केली अन आज उद्या पाऊस येईल या आशेने शेतकऱ्यांनी खात सुद्धा देऊन टाकले. परन्तु निघणारा प्रत्येक दिवस लख्ख ऊन घेऊन निघतो तर होणारी संध्याकाळ सुद्धा वांझोटी असते. आभाळात कोठेच दाटून आलेले ढग नसतात. सालाबादप्रमाणे यंदाही रोज शेतकरी सकाळ संध्याकाळ आभाळाला पाहतो आणि खाली जमिनीत अंकुरित बियाणे करपले काय ते पाहतो

दोन चार दिवसात पाऊस आला नाही तर दुबार पेरणी शिवाय गत्यंतर नाही असे सुदाम शंभरकर, छत्र पाल बनसोड या शेतकऱ्यांनी बोलून दाखविले.

## मेघदूत अन्त्याक्षरी स्पर्धेचे आयोजन रविवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संस्कृत सखी सभा आणि नटराज आर्ट अँड कल्चर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने महाकवी कालिदास विरचित मेघदूत या अजरामर काव्यासह इतर संस्कृत वाङ्मयावर आधारित नावीन्यपूर्ण 'मेघदूत अन्त्याक्षरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवारी १९ जुलै, रोजी दुपारी ३.३० वाजता. नटराज आर्ट अँड कल्चर सेंटर, धरमपेठ, नागपूर येथे संपन्न होणार आहे. संस्कृत साहित्याची गोडी निर्माण करण्यासह मेघदूत आणि अन्य अभिजात संस्कृत वाङ्मयाचा परिचय रसिकांना करून देण्याच्या उद्देशाने या स्पधेर्चे आयोजन करण्यात आले आहे. साहित्यप्रेमी, संस्कृत अभ्यासक तसेच रसिक श्रोत्यांनी जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## स्वाभिमान गहाण ठेवून तडजोडी करणारे लोकांच्या मनातून उतरले : डॉ. ढोके

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्वाभिमान गहाण ठेवून तडजोडी करायच्या नसतात, अशी बोचरी टीका प्रखर रिपब्लिकन वक्ते डॉ. एन. व्ही. ढोके यांनी आजच्या समता सैनिक दलाच्या प्रशिक्षणात केली. यावेळी अध्यक्षस्थानी




प्रसिद्ध व्यावसायीक संजय सोनारकर होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. हर्षवर्धन ढोके व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. ढोके म्हणाले, बाबासाहेबांना अपेक्षित रिपब्लिकन पक्षाच्या पुनर्बांधणीसाठी हर्षवर्धन ढोके सारखा नेता लोकांमधूनच उभा करावा लागेल. नाहीतर स्वाभिमान बाजूला ठेवून नेतेगिरी करणारे नेते संसदेत कविता करीत बसतात किंवा लॉगमार्च काढून इतर पक्षाच्या दावणीला बांधले जातात, अशी टीका डॉ. ढोके यांनी विद्यमान रिपब्लिकन नेत्यांवर केली. राजकारणात शत्रूला हरवण्यासाठी तडजोडी कराव्यात पण स्वाभिमान शाबूत ठेवावा लागतो. तो जर नसेल तर असे नेते लोकांच्या मनातून उतरतात. मा. हर्षवर्धन ढोके म्हणाले, केवळ ब्राम्हणांना शिव्या देऊन कुठला विकास होत नाही. त्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची बांधणी करून राजकारण करावे लागेल. किशोर गजभिये आणि संजय सोनारकर यांची समयोचित भाषणे झाली. संचालन ज्योती तिरपुडे यांनी केले. प्रिया कांबळे, विशाल शेंडे, जावेद पठाण, संतोष शिवणकर, सुचेंद्र मंडपे आदींचे सहकार्य लाभले.

# एकपात्री नाट्य प्रयोगांचा जागर 'मर्म बंधातली ठेव...' १८ जुलै रोजी

## विदर्भ साहित्य संघाचा 'साहित्य कट्टा' उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघाच्या 'साहित्य कट्टा' या उपक्रमांतर्गत शनिवार, १८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, शंकर नगर चौक नागपूर येथे 'मर्म बंधातली ठेव...' हा एकपात्री नाट्य प्रयोगांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

नागपुरातील नाट्य कलावंत या निमित्ताने मराठी रंगभूमीवर गाजलेल्या नाटकांतील एकपात्री स्वगतांचे सादरीकरण करणार आहेत. या कार्यक्रमाच्या संयोजिका सुप्रसिद्ध अभिनेत्री आसावरी तिडके गडेकर असून नाटककार डॉ. पराग घोंगे सूत्रसंचालन करणार आहेत.

देवेंद्र दोडके, प्रभाकर आंबोणे, मीना देशपांडे, मुकुंद वसुले, श्रद्धा तेलंग, नीलकांत कुलसंगे, संयुक्ता थोरात, मोहन पांडे, देवेंद्र लुटे, अशोक आग्रे, विनोद तुंबडे, वैदेही चवरे, दीपलक्ष्मी भट, सलीम शेख, सचिन गिरी, प्रणाली राऊत, गीत काळे, विनोद काळे, अमर कुळकर्णी, अंमर मसराम इत्यादी अनुभवी रंगकर्मी नटसम्राट, एकच प्याला, ती फुलराणी, मत्स्यगंधा, सखाराम बाईंडर, वाजे पाऊल अशा विविध नाटकांतील प्रवेश सादर करतील.

वि. सा. संघाच्या नवीन कार्यकारिणीने सुरू केलेल्या हा साहित्य कट्टा उपक्रम दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी आयोजित केला जातो. साहित्याचे विविध प्रवाह आणि त्यांचे विविधांगी प्रयोग या साहित्य कट्ट्यावर सादर केले जातात. मागील महिन्यात कविता हा साहित्यप्रकार केंद्रस्थानी ठेवून आयोजित या उपक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होतो.

या आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमाला साहित्य, नाट्य आणि अन्य कलारसिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विदर्भ साहित्य संघातर्फे करण्यात आले आहे.





# सुधीर मुनगंटीवार यांना २०२६ चा 'शिव सन्मान पुरस्कार जाहीर

**दै. सिंहवाणी वृत्त, रायगड**

श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती दुर्गराज रायगड यांच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'शिव सन्मान पुरस्कार २०२६" हा महाराष्ट्राचे माजी सांस्कृतिक मंत्री, ज्येष्ठ लोकनेते आणि शिवभक्त सुधीर मुनगंटीवार यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह दादर येथे आयोजित विशेष समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, शिवराज्याभिषेक सोहळ्याची परंपरा, ऐतिहासिक वारसा आणि शिवकालीन स्मृतींचे जतन-संवर्धन यासाठी भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्वाला हा त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कायार्चा गौरव म्हणून समितीच्या वतीने देण्यात येतो. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी दुर्गराज रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी चांदीची पालखी अर्पण करून या ऐतिहासिक सोहळ्याच्या वैभवात मोलाची भर घातली. तसेच श्रीक्षेत्र प्रतापगडावरील श्री भवानी मातेला चांदीचे छत्र अर्पण करून त्यांनी शिवभक्ती, श्रद्धा



आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेप्रती असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली आहे.

इतिहास संवर्धनाच्या दृष्टीने त्यांच्या कायार्तील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक वाघनखे, जी अनेक वर्षे लंडनमध्ये जतन करण्यात आली होती, ती महाराष्ट्रात प्रथमच प्रदर्शित होण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात त्यांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका. या ऐतिहासिक उपक्रमामुळे लाखो शिवप्रेमींना या ऐतिहासिक ठेव्याचे दर्शन घेण्याची संधी उपलब्ध झाली आणि शिवकालीन इतिहासाबद्दल जनमानसात नव्याने अभिमानाची भावना निर्माण झाली.

याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिन हा इंग्रजी दिनांकानुसार नव्हे, तर हिंदू पंचांगातील ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या तिथीनुसारच शासनामार्फत अधिकृतरीत्या साजरा करण्यात यावा या ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयासाठी त्यांनी सातत्यपूर्ण, अभ्यासपूर्ण आणि प्रामाणिक पाठपुरावा केला. शिवप्रेमींच्या भावनांचा आदर राखत या विषयात त्यांनी शासनस्तरावर महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

शिवकार्य, इतिहास संवर्धन, सांस्कृतिक वारशाचे जतन, शिवराज्याभिषेक सोहळ्याचे वैभव वृद्धिंगत करणे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा जागर करण्यासाठी दिलेल्या त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव म्हणून श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती, दुर्गराज रायगड यांच्या वतीने त्यांना 'शिव सन्मान पुरस्कार - २०२६' प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात मान्यवर, इतिहास अभ्यासक, दुर्गप्रेमी, शिवभक्त आणि विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत संपन्न होणार असून, राज्यभरातील शिवप्रेमींनी या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुनील पवार यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना समितीवर सतीश रेवतकर यांची सह-अध्यक्षपदी नियुक्ती

### आमदार चरणसिंग ठाकूर यांचे विश्वासू सहकारी, शेतकरी हिताच्या विकासकामांना मिळणार नवी गती

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेच्या काटोल विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सह-अध्यक्षपदी सतीश रेवतकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील पाणंद रस्त्यांचा विकास, शेतकऱ्यांच्या दळणवळणाच्या सुविधा आणि शेतीपूरक पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.



काटोल विधानसभा मतदारसंघाचे आमदार चरणसिंग ठाकूर यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळख असलेले सतीशजी रेवतकर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून मतदारसंघातील विकास कामांमध्ये सक्रिय भूमिका बजावली आहे. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींशी सातत्याने संपर्क ठेवून विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत शासनाने त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत सर्व ऋतूंमध्ये पोहोचता येईल असे दर्जेदार रस्ते निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे शेतीमालाची वाहतूक सुलभ होण्यास, उत्पादन खर्च कमी होण्यास तसेच ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. समितीच्या माध्यमातून पाणंद रस्त्यांच्या प्रस्तावांची छाननी, प्राधान्यक्रम निश्चित करणे, विविध विभागांमध्ये समन्वय साधणे, विकासकामांचा नियमित आढावा घेणे तसेच कामांच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी पार पाडली जाणार आहे. त्यामुळे योजनांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक आणि प्रभावी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सतीश रेवतकर यांच्या नियुक्तीमुळे काटोल विधानसभा क्षेत्रातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाणंद रस्त्यांच्या कामांना गती मिळेल, असा विश्वास शेतकरी व ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण विकासाच्या विविध योजना अधिक परिणामकारकपणे राबवल्या जातील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, त्यांच्या नियुक्तीबद्दल राजकीय, सामाजिक, कृषी व विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधवांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, काटोल विधानसभा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी ही नियुक्ती उपयुक्त ठरेल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# ज्येष्ठ नागरिकांना मुंबईत छत्री वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई (रवींद्र मालुसरे)**

८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या वचनाला अनुसरून शाखा क्रमांक २०४ चे उपशाखाप्रमुख श्री राजन मनोहर कोतावडेकर यांच्या माध्यमातून लालबागमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी छत्री वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शिवसेना सचिव सुधीर साळवी, प्रभाग क्रमांक २०४ चे नगरसेवक किरण तावडे तसेच समाजसेवक राजेंद्र लांजवळ यांच्या शुभ हस्ते छत्र्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाचे चिटणीस बाळासाहेब कांबळे, ज्येष्ठ शिवसैनिक रमेश पाटील, सतीश खणकर, किरण वाणी, राजन राणे, राजेंद्र महाडीक, अशोक दातखिले,उपशाखाप्रमुख विलास कांबळे,विनय शेट्ये, धर्मेंद्र दुबे आणि शिवसैनिक प्रशांत केळसकर,संदीप तुळसकर, प्रशांत जानवलकर, विक्रांत जाधव, शुभम जाधव, सुदर्शन केरकर, शुभम दुबे, विजय महाड़ीक व महिला आघाडी प्रमुख समृद्धी सोनावणे, इंद्रायणी तेली इत्यादी उपस्थित होते.

# दिल्लीतील सोनम वांगचुक यांच्या आमरण उपोषणाला नागपुरातून जाहीर पाठिंबा

### 'आम्ही सारे भारतीय' संघटनेची पत्रकार परिषद; १९ जुलैपासून साखळी उपोषण आंदोलनाची घोषणा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दिल्ली येथे पर्यावरणवादी, वैज्ञानिक आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी 'आम्ही सारे भारतीय' संघटनेच्या वतीने नागपुरात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारने नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारावी




आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

पत्रकार परिषदेत बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, पेपरफुटी प्रकरणामुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून सरकार या गंभीर प्रश्नाकडे असंवेदनशीलपणे पाहत आहे. दिल्लीतील सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला नैतिक पाठिंबा देण्यासाठी नागपूरच्या संविधान चौकात १९ जुलै २०२६ पासून साखळी उपोषण आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली.

यावेळी केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध व्यक्त करत विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी आणि शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. तसेच, या आंदोलनात सामाजिक, राजकीय व विविध जनसंघटनांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. पत्रकार परिषदेला अशोक सरस्वती, कॉ. अरुण लाटकर, सरदार जगजीत सिंग, डॉ. विनय बारहाते, बाबा शेळके, अरुण गाडे, प्रा. रमेश पिसे, दिनेश अंडर शहरो, डॉ. सुरेश बर्वे, विलास भोंगाडे, प्रा. राहुल मून यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

---

थोडक्यात

## १० वी, १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ १९ जुलै रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ शनिवार, १९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सामाजिक न्याय भवन सभागृह, दीक्षाभूमी रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांसह यूपीएससी व एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा सन्मान करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार असून, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोंयर प्रमुख उपस्थित राहणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हाधिकारी मा. कुमार आशीर्वाद व अपर पोलीस आयुक्त मा. विनिता साहू उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कामगार नेते अरुण गाडे राहणार असून, विशेष अतिथी म्हणून डॉ. राजाभाऊ टाकसाळे उपस्थित राहतील. तसेच समाजकल्याण, आरोग्य, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाने सर्व गुणवंत विद्यार्थी,पालक, सदस्य व नागरिकांनी या प्रेरणादायी सत्कार समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन केले जात आहे.

## ताजाबाद शरीफ दरगाह परिसर में श्रद्धालुओं के लिए लंगर का आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हजरत बाबा ताजुद्दीन (र.अ.) के सालाना १०४ वे उर्स के पावन अवसर पर हजरत बाबा ताजुद्दीन आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागपुर के तरफ से लंगर वितरण का आयोजन किया गया। हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह के १०४ वें सालाना उर्स के पावन अवसर पर शादाब एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित हजरत बाबा ताजुद्दीन आर्ट्स एंड कॉमर्स कॉलेज, ताजाबाद शरीफ, उमरेड रोड, नागपुर की ओर से ताजाबाद शरीफ दरगाह परिसर में श्रद्धालुओं के लिए लंगर (भोजन वितरण) का आयोजन १० जुलै से १५ जुलै तक किया गया। इस अवसर पर बड़ी संख्या में जायरीन एवं श्रद्धालुओं ने लंगर ग्रहण कर हजरत बाबा ताजुद्दीन के दरबार में हाजिरी दी।

महाविद्यालय परिवार द्वारा सेवा एवं मानवता की भावना को आगे बढ़ाते हुए श्रद्धालुओं को भोजन वितरित किया गया। कार्यक्रम में संस्था के अध्यक्ष हाजी अब्दुल सलीम अब्दुल जब्बार, सचिव हाजी मोहम्मद शादाब अब्दुल सलिम, संस्था के अन्य पदाधिकारी, महाविद्यालय के प्राचार्य डॉ. अब्दुल शकील अब्दुल सत्तार डॉ. सुभाष धोटे, प्रा. डॉ. सुरेश काळे, प्रा. डॉ. विनोद शेंडे, प्रा. डॉ. मोहम्मद समीर बडगुजर, शादाब खान, कुमेश बिहार, मार्तंड गोंडाने, नियाज अली, प्रकाश मेश्राम, गणेश राजपूत ने अपणा सहयोग प्रदान किया। कार्यक्रम का उद्देश्य हजरत बाबा ताजुद्दीन की शिक्षाओं, प्रेम, सेवा, भाईचारा और मानवता को जन-जन तक पहुँचाना तथा समाज में आपसी सौहार्द और सद्भावना को बढ़ावा देना था। लंगर कार्यक्रम श्रद्धा, सेवा और सामाजिक समरसता के वातावरण में सफलता पूर्वक संपन्न हुआ।

## गांगणेर येथे नैसर्गिक शेतीशाळेचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

गांगनेर येथे नैसर्गिक शेतीशाळा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाला घनश्याम खंडाते यांनी शेतकऱ्यांना बांधावर सेंद्रिय निविष्ठा दशपर्णी, घनजीवाअमृत,जीवामृत निर्मिती व त्याचा वापर,पशुखाद्य तयार करणे, पशुपालन शेतीला कशाप्रकारे जोडधंदा म्हणून चांगला करता येईल यावर मार्गदर्शन केले. तसेच दिनेश फुंडे यांनी खर्च कमी करण्याकरता जैविक खते वापर व कीटकनाशकाचा दुष्परिणाम, CRT टेकनिक, DSR व DPDC अंतर्गत गटामार्फत बेड मेकर / डिबलर ७५%अनुदानावर घेण्याबात सविस्तर माहिती दिली. सहायक कृषी अधिकारी जुमडे यांनी कृषि विभाग अंतर्गत विविध योजना बाबत माहिती देऊन शेतकरी यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निराकारण केले. प्रशांत शेंडे, स. त. व्य.(आत्मा) यांनी,माती नमुना तपासणी, अझोला चे महत्व, बीज प्रक्रिया हिरवडीचे खताचे महत्व, ट्रायकोडर्मा, बेड वर लागवड केलेले पिकाचे महत्व व उत्पादन याबाबत माहिती दिली. सदर शेतीशाळेत आयोजक माजी सरपंच गांगनेर प्रदीप राऊत यांनी या शेतीशाळाला निवड केलेले शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच श्रीधर वाघमारे, माजी कृषी मित्र, गांगनेर यांनी शेतीशाळेत मोलाचे सहकार्य केलेत.

## पर्यावरण संवर्धनासाठी वृक्ष लागवड ; आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची बैठक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर जिल्हा परिषद आणि ग्रीन फाउंडेशन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनासाठी १० लक्ष वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला असून, यासंदर्भात महत्त्वाची बैठक शुक्रवारी १७ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत नागपूर शहरात ५ लक्ष आणि ग्रामीण भागात ५ लक्ष वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, नागपूर सुधार प्रन्यास सभापती संजय मीना, मनपा आयुक्त डॉ विपीन, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आणि इतर उपस्थित राहणार आहे.

थोडक्यात

## एयआयआर प्रक्रियेबाबतच्या चिंतेत असलेल्या ज्येष्ठाचा गांधी तलावात मृतदेह, उमरेडमध्ये खळबळ



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड शहरातील टिपले ले-आऊट येथील रहिवासी तथा भूमी अभिलेख कार्यालय, कुही येथून सन २००४ मध्ये सेवानिवृत्त झालेले जयराम लहुजी रणदिवे (वय ८२) यांचा मृतदेह आज स्थानिक गांधी तलावात आढळून आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. रणदिवे हे काल सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरातून बेपत्ता झाले होते. याप्रकरणी कुटुंबीयांनी पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद केली होती. त्यानंतर शोधमोहीम सुरू असताना आज गांधी तलावात त्यांचा मृतदेह आढळून आला. मृतांचे पुत्र मनोज रणदिवे यांनी सांगितले की, विशेष मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत त्यांच्या वडिलांच्या मनात मोठी भीती निर्माण झाली होती. मतदार यादीत नावासंदर्भात अडचण आल्यास आपली पेन्शन व इतर शासकीय सुविधा बंद होतील, अशी त्यांची समजूत झाली होती. कुटुंबीयांनी वारंवार समजावून सांगूनही ते सतत चिंताग्रस्त राहत असल्याचे त्यांनी सांगितले.

जयराम रणदिवे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि तीन मुली असा परिवार आहे. दरम्यान, पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठविला असून, मृत्यूचे नेमके कारण आणि सर्व परिस्थितीचा तपास सुरू आहे. कुटुंबीयांनी व्यक्त केलेल्या चिंतेची नोंद असली, तरी या मृत्यूचा एसआयआर प्रक्रियेशी थेट संबंध असल्याचे अद्याप अधिकृतरीत्या स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे तपास पूर्ण होईपर्यंत त्याबाबत कोणताही निश्चित निष्कर्ष काढलेला नाही.

## एकोणा खुल्या कोळसा खाणीमध्ये ट्रकचालकाचा कोळशाच्या ढिगाऱ्यात दबून मृत्यू



**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा -धर्मेंद्र शेरकुरे**

वरोरा तालुक्यातील एकोणा खुली कोळसा खदान नं १ खाणीमध्ये ट्रकचालकाचा कोळशाच्या ढिकाऱ्यामध्ये दबून आज रात्री पहाटेला ४.४५ वाजता मृत्यू झाला मृत चालक पुष्पेन्द्र सिंह वय ४९ वर्ष मु . पगरा पोस्ट वरशोभा ता गुणोर जिल्हा पन्ना मध्य प्रदेश असे मृत्यू पावलेल्या चालकाचे नाव आहे. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय वरोरा येथे ठेवण्यात आला आहे. मृतक पुष्पेन्द्र सिंग हा चड्डा ट्रान्सपोर्ट कंपनीचा ट्रक चालक होता तो दररोज एकोणा कोळसा खदानितुन कोळसा जिएमआर कंपनी येथे पुरवठा करीत होता त्या वाहनाचा क्रमांक MH 34 BG 09 71 कोळसा खाणीमध्ये मध्ये अपघात झाल्याची बातमी कळताच चड्डा ट्रान्सपोर्ट कंपनीच्या चालकांनी, चड्डा ट्रान्सपोर्ट आणि WCLच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून मृत्यू पावलेल्या पुष्पेंद्र सिंह यांच्या कुटुंबियांना पन्नास लाख रुपये आर्थिक नुकसान भरपाई व ट्रक चालकांना पीएफ तसेच अपघाती विमा देण्याबाबत विचारणा केली असता कंपनीकडून उडवाउडीची उत्तरे आल्याने चड्डा ट्रान्सपोर्ट कंपनीच्या ट्रक चालकांनी वरोरा गाठत पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली तसेच उपविभागीय अधिकारी वरोरा यांच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.

या संदर्भात वरोरा विधानसभा मतदारसंघांचे आमदार करण देवतळे यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयात आंदोलन करणाऱ्या ट्रक चालकांशी संवाद साधत उद्या चड्डा ट्रान्सपोर्ट,जि एम आर थर्मल पावर कंपनी वरोरा,कॅलिबर मायनिंग कंपनी व वेस्टर्न कोल इंडिया लिमिटेडच्या अधिकाऱ्यांची बैठक लावुन तोडगा काढण्यासाठी उपविभागीय अधिकारी संदीप भस्के यांना तोंडी आदेश दिले आहे. मृतकाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन आमदार करण देवतळे यांनी आंदोलनकर्त्या ट्रक चालकांना दिले. यावेळी अमोल पिंपळ शेंडे, लोकपाल सिंग, परमार देव प्रताप रघुवंशी, सचिन रघुवंशी, निलेश देठे, प्रतीक मोडक, शैलेंद्र प्रतापसिंग ,राजेंद्र प्रतापसिंग, आनंद पटेल,राम चव्हाण,सुरेश पिंपळकर आदी ट्रक चालक उपस्थित होते.

# प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत नागपूर जिल्ह्यातील १९ लाख ८८ हजार ४८३ लाभार्थी पात्र

**मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी केले प्रशासनाचे कौतुक**
**गत तीन महिन्यात १ लाख ७५ हजार ९५६ नवीन लाभार्थी पात्र गोरगरिब लाभार्थ्यांना मिळणार ५ लाख रुपयापर्यंतचे उपचार**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील प्रत्येक गोरगरिब व्यक्तीला उत्तम आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, त्यांना आजारावर मात करण्यासाठी चांगले उपचार मिळावेत व यासाठी लागणाऱ्या उपचाराच्या खर्चाचा आर्थिक ताण पडू नये याद्दष्टीने प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अर्थात आयुष्मान भारत योजना राष्ट्रीय स्वास्थ्य प्राधिकरणामार्फत राबविल्या जाते. या योजनेच्या लाभासाठी गत तीन महिन्यात नागपूर जिल्ह्यातील तब्बल १ लाख ७५ हजार ९५६ नवीन लाभार्थ्यांना आयुष्मान भारत ई-कार्ड काढण्यात आले. यामुळे आता या लाभार्थ्यांना भविष्यात काही आजार जडल्यास त्यावर उपचार करण्यासाठी प्रतिवर्ष प्रतिकुटुंब ५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य विमा संरक्षणाचा लाभ घेता येईल.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा परिषद, महानगर पालिका यांच्या आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांची उत्तम टिम तयार करुन या कामाला गती दिली. सद्यस्थितीत जिल्ह्यातील एकूण १९ लाख ८८ हजार ४८३ पेक्षा अधिक लाभार्थी या विमा संरक्षणासाठी पात्र ठरले आहेत. जिल्ह्यातील या वैशिष्टपूर्ण




कामाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाचे कौतुक करुन अधिकाधिक लोकांपर्यंत हे विमा कवच पोहोचवून प्रत्येकाला उत्तम आरोग्याच्या सुविधा पोहोचाव्यात यासाठी सूचना दिल्या.

मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र जी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सुरू असलेल्या लोककल्याणकारी कार्यात नागपूर जिल्हा प्रशासनाने दिलेले हे महत्त्वाचे योगदान आहे. या उत्तम कामगिरीबद्दल नागपूर जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून मी नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी विनायक महामुनी आणि आयुष्यमान भारत योजनेत काम करीत असलेल्या सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांचे मी अभिनंदन करतो, या शब्दात महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शुभेच्छा दिल्या.

## वरोरा पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन व प्रतिबंधक कार्यवाही कॅम्पचे ठाण्यात आयोजन

**जिल्हा अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांची उपस्थिती**

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा धर्मेंद्र शेरकुरे**

पोलीस स्टेशन वरोरा येथे उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा श्री संतोष बाकल यांचे नेतृत्वात तसेच पोलीस स्टेशनचे ठाणेदार ओमप्रकाश सोनटक्के यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन वरोरा यांचेकडून वरोरा शहरांमध्ये कोंबिंग ऑपरेशन करण्यात आले सदर कोंबिंग ऑपरेशन वरोरा शहरातील जत्रा वार्डात, फुकट नगर आनंदवन व मार्केट परिसरात करण्यात आले कोंबिंग ऑपरेशन दरम्यान ४०



वाहनावर कार्यवाही करण्यात आली तसेच पंधरा सराईत गुन्हेगार चेक करण्यात आले तसेच विनाकारण संशयित रात्रीला फिरणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली सदर कोंबिंग ऑपरेशनमध्ये वरोरा विभागातील सात अधिकारी व २५ अंमलदार आरसीपी लाटून चे १९ अमलदार हजर होते.


वरोरा पोलीस स्टेशन येथे प्रतिबंधक कार्यवाहीचे आयोजन करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा संतोष बाकल यांचे नेतृत्वात तसेच वरोरा स्टेशनचे ठाणेदार ओमप्रकाश सोनटक्के यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन वरोरा येथे सराईत गुन्हेगार व ज्याचे विरुद्ध पोलीस स्टेशन वरोरा येथे गुन्हे दाखल आहे. असे आरोपी विरुद्ध प्रतिबंधक कारवाईचा कॅम्प ठेवून सदर प्रतिबंधक कॅम्पला अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे प्रत्यक्ष हजर राहून त्यांचे कार्यालयातील कर्मचारी यांचे कडून पोलीस स्टेशन वरोरा, पोलीस स्टेशन भद्रावती, पोलीस स्टेशन माजरी येथील आरोपीविरुद्ध प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली.

१२१ आरोपीतांकडून प्रतिबंधक बॉण्ड घेण्यात आले सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक आयुष नोपानी चंद्रपूर, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष बाकल यांच्या मार्गदर्शनाखाली वरोरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार ओमप्रकाश सोनटक्के यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन येथे अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

## पुण्यातील कॅम्पातून चक्क ८०० कोंबड्यांची चोरी

**पुणे** : महाराष्ट्राची शैक्षणिक पंढरी असलेल्या पुण्यात गेल्या काही महिन्यात वाढती गुन्हेगारी हा चिंतेचा विषय बनली आहे. विशेष म्हणजे, आजवर सोनं, चांदी, मोबाईल, महागड्या गाड्या अशा अनेक मौल्यवान आणि किंमती वस्तू चोरीला गेल्याच्या अनेक घटना ऐकल्या असतील किंबहुना पहिल्या असतील. पण, आता अनपेक्षित अशी चोरी चक्क पुण्यातून झाली आहे. खरंच पुण्यात असं होणार आहे का? असा प्रश्न अनेकांना पडला मात्र हे खरंय.

## गोंदिया जिल्ह्याचे निसर्गवैभव : हाजरा फॉल पर्यटकांसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यात निसर्गाच्या कुशीत वसलेला हाजरा फॉल हा विदर्भातील एक रमणीय व मनमोहक नैसर्गिक धबधबा म्हणून ओळखला जातो. पावसाळ्याच्या दिवसांत या धबधब्याचे रूप अधिकच खुलून दिसते. उंच कड्यावरून कोसळणारे शुभ्र जलप्रवाह, सभोवतालचा हिरवागार दाट जंगल परिसर आणि प्रसन्न वातावरण पर्यटकांना अक्षरशः मंत्रमुग्ध करून टाकते.

स्थानिक माहितीनुसार, ब्रिटिश काळात हाजरा नावाच्या एका इंग्रज अधिकाऱ्याने या धबधब्याचा शोध घेतला व परिसराच्या विकासासाठी पुढाकार घेतला. त्यानंतर या ठिकाणाला "हाजरा फॉल" हे नाव प्राप्त झाले, अशी माहिती सांगितली जाते.

हाजरा फॉल हे वर्षभर पर्यटकांचे आकर्षण असले तरी पावसाळ्यात येथे पर्यटकांची विशेष गर्दी पाहायला मिळते. गोंदिया जिल्ह्यासह भंडारा, नागपूर, चंद्रपूर तसेच इतर जिल्ह्यांमधूनही मोठ्या संख्येने पर्यटक या निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्यासाठी येथे भेट देतात.

या पर्यटनस्थळाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे धबधब्याच्या वरच्या भागातून जाणारा रेल्वे मार्ग आणि बोगदा. बोगद्यातून धावणारी रेल्वे पाहण्याचा अनुभव पर्यटकांसाठी विशेष आकर्षण ठरतो. आजूबाजूला पसरलेले दाट जंगल, पक्ष्यांचा किलबिलाट आणि शांत वातावरण यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी व छायाचित्रकारांसाठी पर्वणी ठरतो.

पर्यटकांच्या सुविधेसाठी स्थानिक समितीच्या पुढाकाराने परिसरात बांबूपासून आकर्षक प्रवेशद्वार उभारण्यात आले असून, झुले, बसण्याची व्यवस्था तसेच चहा-नाश्त्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे कुटुंबासह येणाऱ्या पर्यटकांना येथे आनंददायी आणि सुरक्षित अनुभव मिळत आहे.

निसर्गाचे अद्भुत सौंदर्य, स्वच्छ वातावरण आणि मनाला भुरळ घालणारा धबधबा यामुळे हाजरा फॉल हे गोंदिया जिल्ह्याच्या पर्यटन नकाशावरील एक महत्त्वाचे आणि अविस्मरणीय ठिकाण म्हणून ओळखले जात आहे.

## वीजचोरी प्रकरणात थकबाकीचा भरणा; न्यायालयीन सुनावणीत महावितरणची सकारात्मक भूमिका

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मौजा झूनकी, ता. कळमेश्वर येथील वीजचोरी प्रकरणात संबंधित ग्राहकाने ८,५८,८२० इतक्या वीजचोरीच्या देयकाचा भरणा केल्यानंतर झालेल्या न्यायालयीन सुनावणीत महावितरणने नियमानुसार नवीन वीजजोडणी देण्याबाबत सकारात्मक भूमिका मांडली आहे.

दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी मौजा झूनकी, ता. कळमेश्वर येथील मुदशीर अली मुसबीर हुसेन (ग्राहक यांच्या ठिकाणी वीजचोरी आढळून आली होती. ही कारवाई महावितरणचे उपकार्यकारी अभियंता रोशन शेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ अभियंता दिनेश संसारे व सहाय्यक अभियंता मयुरी बेरड यांनी केली. यावेळी. सावजी मेश्राम व योगेश्वर ठाकरे हेही कारवाईदरम्यान उपस्थित होते. चोरी पकडल्यानंतर ग्राहकाने वीजचोरीची रक्कम व दंड न भरल्याने वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता.

या प्रकरणात आकारण्यात आलेल्या ८,५८,८२० रकमेचा भरणा संबंधित ग्राहकाने दि. १० जुलै २०२६ रोजी सहाय्यक अभियंता, कळमेश्वर उपविभाग कार्यालयात केला असून त्याची नोंद न्यायालयात सादर करण्यात आली.




न्यायालयीन सुनावणीदरम्यान महावितरणने स्पष्ट केले की, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत पुनर्जोडणीसाठी अर्ज करून आवश्यक शुल्क भरल्यास पूर्वीची वीजजोडणी पुन्हा सुरू करता येते. मात्र, संबंधित ग्राहकाने विहित मुदतीत पुनर्जोडणीसाठी अर्ज न केल्याने संबंधित वीजजोडणी कायमस्वरूपी खंडित श्रेणीत वर्ग झाली आहे. त्यामुळे नियमानुसार पूर्वीची वीजजोडणी पूर्ववत करणे शक्य नसल्याचे न्यायालयास सांगण्यात आले.

तथापि, ग्राहकाला वीजपुरवठा लवकर मिळावा यासाठी महावितरणने सकारात्मक भूमिका घेतली असून, नवीन वीजजोडणीसाठी आवश्यक मागणी रक्कम भरून सर्व औपचारिकता पूर्ण होताच अवघ्या ३ ते ४ दिवसांत नवीन वीजजोडणी देण्यात येईल, अशी माहिती न्यायालयात देण्यात आली.

महावितरणने नागरिकांना आवाहन केले आहे की, वीजचोरी टाळावी, नियमांचे पालन करावे आणि वीजजोडणी किंवा पुनर्जोडणीसाठी विहित कालावधीत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून सहकार्य करावे.

## 'करिअर संसद २०२६-२७' चा शपथविधी सोहळा उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स महाविद्यालय, नागपूर येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत करिअर संसद २०२६-२७ चा शपथविधी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला.




जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर होत्या तर नागपूर जिल्हा नियोजन समिती सदस्य अश्विन भोंगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी करिअर संसद २०२६-२७ साठी निवड झालेल्या मुख्यमंत्री, विविध मंत्रीमंडळ सदस्य तसेच संसद सदस्यांनी पदाची शपथ घेतली.

अश्विन भोंगाडे यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी, लोकशाही मूल्ये आणि जबाबदार नागरिकत्व याविषयी मार्गदर्शन केले. तर डॉ. मेधा कानेटकर यांनी करिअर संसद ही विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, निर्णयक्षमता, संवादकौशल्य, संघभावना आणि प्रशासकीय कौशल्य विकसित करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ असल्याचे सांगितले. उपप्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मुख्यमंत्री विघ्नेश जीवतोडे, नियोजन मंत्री सोनाली जाधव, कायदे व शिस्त पालन मंत्री संजना साहू, सामान्य प्रशासन मंत्री दिव्या वाघमारे, माहिती व प्रसारण मंत्री संभव गुप्ता, उद्योजकता विकास मंत्री अनुष्का दिप्ते, रोजगार स्वयंरोजगार मंत्री शुभांगी मेश्राम, कौशल्य विकास मंत्री पंकज मडावी, संसदीय कामकाज मंत्री विशाखा सयाम, महिला व बालकल्याण मंत्री दिव्या बोकडे तर सदस्य म्हणून हर्षल उईके यांची नियुक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन करिअर कट्टा समन्वयक प्रा. सारिका विक्रांत पाटील , डॉ. मृण्मयी कानेटकर यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## ग्रामीण रुग्णालय परिसरातील कडुनिंबाचे झाड बसवर कोसळले : मोठे नुकसान, सुदैवाने जीवितहानी टळली

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

आज दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास झालेल्या जोरदार पावसामुळे ग्रामीण रुग्णालय परिसरातील सुमारे १०० वर्षे जुने कडुनिंबाचे विशाल झाड अचानक कोसळून उभ्या असलेल्या टीजी ०१ झेड ००४१ क्रमांकाच्या आदिलाबाद डेपोच्या बसवर पडले. या घटनेत बसचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



जोरदार पावसामुळे उन्मळून पडलेल्या झाडाच्या मोठ्या फांद्या व खोडाचा भाग बसच्या समोरील काचेवर आदळल्याने काच पूर्णपणे फुटली. झाडाचे लाकूड काच फोडून थेट बसच्या आतील भागात घुसल्याने बसचे मोठे नुकसान झाले. या घटनेमुळे काही काळ मुख्य मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. झाड रस्त्यावर आडवे पडल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. त्यानंतर स्थानिक नागरिक व संबंधित यंत्रणांनी झाड हटविण्याचे काम हाती घेतल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

दरम्यान, ग्रामीण रुग्णालय परिसरात सध्या संरक्षण भिंतीचे (वॉल कंपाऊंड) बांधकाम सुरू असून जेसीबी साहाय्याने खोदकाम केले जात आहे. या खोदकामादरम्यान झाडाच्या मुळांना धक्का बसून ती तुटल्यामुळे झाड कमकुवत झाले आणि त्यानंतर जोरदार पावसात ते कोसळले, असा स्थानिक नागरिकांकडून अंदाज व्यक्त केला जात आहे.

या घटनेनंतर परिसरातील जुनी व धोकादायक झाडांची तातडीने तपासणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

